# आधुनिक केसरी

रविवार, ४ डिसेंबर २०२२

⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -११२

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 04 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-112 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# प्रत्येक राजकीय पक्ष स्वार्थी : छत्रपती उदयनराजे

## किल्ले 'रायगड' येथे निर्धार शिवसन्मानाचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड : प्रत्येक राजकीय पक्ष स्वार्थी झाला. पुढाऱ्यांनी जाती धर्मात तेढ निर्माण केली. देशाचे तीन तुकडे झाले आहेत. ३० तुकडे व्हायला वेळ लागणार नाही. राजकारणातील स्वार्थ पाहून खेद वाटतो. शिवरायांनी निर्माण केलेले राज्य हे शिवरायांचे राज्य म्हणून ओळखले गेले नाही. ते रयतेचे राज्य म्हणून ओळखले गेले. शिवरायांनी कधीच स्वार्थाचा विचार केला नाही, असे छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले. खासदार उदयनराजे भोसले यांच्या नेतृत्वात शनिवारी किल्ले 'रायगड' येथे निर्धार शिवसन्मानाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थितांना संबोधताना खासदार उदयनराजे भोसले यांनी राज्यपालांसह सर्व राजकीय पक्षांवर निशाणा साधला.**

छत्रपती उदयनराजे भोसले पुढे म्हणाले की, शिवरायांचा अवमान करणाऱ्यांवर पांघरून घालताना लाज वाटू द्या. लाज वाटत नाही या लोकांना, महाराजांचे नाव घेताना गर्वाने घेतात आणि स्वार्थ साधला गेल्यानंतर जेव्हा अवमान होतो त्यावेळी एकही व्यक्ती धारिष्ट्य दाखवत नाही. नितीमत्ता कुठे गेली यांची, का ठामपणे मत व्यक्त करत नाहीत, असा सवाल करत उदयनराजे भोसले सत्ताधाऱ्यांवर आणि विरोधकांवर चांगलेच संतापले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सगळ्यांना एकत्र घेऊन 'स्वराज्य' स्थापन केले. प्रत्येक जाती, धर्माचा सन्मान करण्याची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांनी दिली. त्याच शिवरायांचा अपमान सुरू असल्याचे उदयनराजे यांनी म्हटले. राज्यपालांच्या वक्तव्यावर राज्यातील नेते शांत का बसलेत? असा सवालही त्यांनी यावेळी केला. अनेक राजांचे राज्य त्या राजांच्या नावाने ओळखले गेले. पण आपल्या शिवाजी महाराजांचे राज्य हे रयतेचे राज्य म्हणून ओळखलं जातं. आज तीच रयत स्वार्थ पाहताना दिसत आहे. राजकीय स्वार्थ साधत आहे. त्यामुळेच महाराजांचा अवमान करण्याचं धाडस होत आहे. आपण पुढच्या पिढीला काय आदर्श देणार आहोत? प्रोटोकॉल बोलून राज्यपालांना का पाठीशी घालतात?, असा सवालही उदयनराजेंनी यावेळी केला. शिवरायांचा अवमान झाला तर मी गप्प बसणार नाही. अवमान करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवायची वेळ आलीय, असे उदयराजे भोसले हे उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले.



# मी जिथं जातो, तिथं भारत माझ्यासोबत

## सुंदर पिचाईंना 'पद्म भूषण' प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांना सॅन फ्रान्सिस्कोमध्ये भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्म भूषण' प्रदान करण्यात आला. भारताचे अमेरिकेतील राजदूत तरणजीत सिंग संधू यांच्या हस्ते व्यापार आणि उद्योग प्रकारात २०२२ या वर्षासाठी पिचाई यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारत हा माझाच एक भाग आहे. मी जिथं जातो, तिथं भारत माझ्यासोबत असतो, अशी प्रतिक्रिया यावेळी पिचाई यांनी दिली. यावर्षीच्या सुरवातीला 'पद्म भूषण' पुरस्कारासाठी १७ दिग्गजांची नावे सरकारकडून घोषित करण्यात आली होती. मी या पुरस्कारासाठी भारतीय नागरिक आणि सरकारचा अत्यंत आभारी आहे. ज्या देशाने मला घडवले, त्या देशाकडून हा सन्मान मिळणं माझ्यासाठी मोठी बाब आहे, असे हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर ५० वर्षीय पिचाई म्हणाले. शिक्षण आणि ज्ञानाची आवड असलेल्या कुटुंबात मी लहानाचा मोठा झालो, हे माझं भाग्य आहे. माझ्या आवडीनुसार क्षेत्र निवडता यावं, यासाठी आई-वडिलांनी मोठा त्याग केला, अशी भावना पिचाई यांनी यावेळी व्यक्त केली. गुगल आणि भारत यांच्यातील महान



भागीदारी सुरू ठेवण्यासाठी मी उत्सुक आहे. तंत्रज्ञानाचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही एकत्र काम करत आहोत", असे यावेळी पिचाई यांनी सांगितलं. सॅन फ्रान्सिस्कोतील या पुरस्कार सोहळ्यात भारताचे वाणिज्यदूत टी. व्ही. नागेंद्र प्रसाद यांच्यासह पिचाई यांचे कुटुंबीय उपस्थित होते. पिचाई यांनी तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवून अमर्यादीत शक्यता निर्माण केल्याचे सांगत संधू यांनी त्यांचा गौरव केला. जगाच्या विविध भागांमध्ये डिजिटल साधने आणि कौशल्ये समाजाच्या सर्व घटकांना उपलब्ध करून देण्याच्या दिशेने ते प्रयत्न करत आहेत, असे संधू म्हणाले. गुगलने यावर्षी मशीन लर्निंगमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत भाषांतर सेवेमध्ये आणखी २४ भाषांचा समावेश केला आहे. यामध्ये भारतातील आठ भाषांचा समावेश आहे.

# ताडोबात वाघांच्या चार बछड्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील शिवनी वनपरिक्षेत्रात वाघाचे चार बछडे मृतावस्थेत आढळून आल्याने वन खात्यात खळबळ उडाली आहे. यापूर्वी १ डिसेंबर रोजी ताडोबा बफर झोनमध्ये एक वाघीण व एक मादी शावक मृतावस्थेत मिळाले होते. त्यानंतर दोन दिवसातील ही दुसरी घटना आहे. ताडोबा प्रकल्पातील अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, वनाधिकारी गस्तीवर असताना वाघिणीचे चार बछडे मृतावस्थेत आढळून आले. घटनेची माहिती ताडोबा प्रकल्पाचे संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांना देण्यात आली. माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले. यापूर्वी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील शिवनी वनपरिक्षेत्रातील वासेरा नियतक्षेत्रात 'टी-७५' या वाघिणीचा मृतदेह आढळला होता. त्यानंतर मोहर्ली वनपरिक्षेत्रातील आगरझरी जंगलातील कक्ष क्रमांक १८९ मध्ये 'टी-६०' या वाघिणीचा मादी शावक मृतावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली होती. त्यानंतर ही घटना उघडकीस आली आहे. चारही मृत शावक सहा ते सात महिन्यांचे असल्याचे सांगण्यात येत आहे. मोठ्या वाघाने या चार शावकांवर हल्ला केल्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. ताडोबा व्यवस्थापनाने मृत्यूचे अधिकृत कारण सांगितलेले नाही. हा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, मृत शवकांची उत्तरीय तपासणी केल्यानंतरच अधिकृत कारण समोर येईल, असे सांगितले जात आहे.

# मराठमोळ्या रुद्रांक्षचा इजिप्तमध्ये बोलबाला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नेमबाज रुद्रांक्ष पाटील याने याने ईजिप्तची राजधानी कैरो येथे झालेल्या प्रेसिडेंट कपच्या 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत याने सुवर्ण पदक जिंकत महाराष्ट्रासह भारताचा नाव मोठे केले आहे. विशेष म्हणजे या कामगिरीमुळे जागतिक शुटर ऑफ द इअरसह गोल्डन टारगेटचा पहिला भारतीय मानकरी रुद्रांक्ष ठरला आहे. तसेच त्याला तब्बल 15000 डॉलरचे (जवळपास 12 लाख भारतीय रुपये) बक्षीस मिळाले आहे. रुद्रांक्ष हा मागील काही काळापासून 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत कमाल कामगिरी करत एकामागे एक यश मिळवत आहे. ईजिप्त देशाची राजधानी कैरो येथे प्रेसिडेंट कप स्पर्धेचे सामने पार पडले. यावेळी भारतासाठी 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत रुद्रांक्षने सुवर्ण पदक जिंकले. नुकत्याच झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेनंतर जागतिक रॅंकिंगमध्ये पहिल्या अव्वल 12 स्थानी असलेल्या नेमबाजांचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय शुटिंग स्पोर्ट फेडरेशनने या स्पर्धेसाठी टॉप 12 नेमबाजाना निमंत्रीत करुन सदरची स्पर्धा आयोजित केली होती. रुद्रांक्ष पाटीलने पात्रता फेरीत 630.1 गुण मिळवून सेमी फायनलमध्ये प्रवेश निश्चित केला. सेमी फायनलमध्ये ऑलंपिक विजेत्या खेळाडूंना मात देऊन त्याने सामन्यावर आपलं वर्चस्व गाजवत फायनलमध्ये थाटात प्रवेश केला. विशेष म्हणजे फायनलमध्ये त्याचा सामना पुन्हा एकदा ईटलीचा स्टार नेमबाजपटू डॅनिलो सोलार्जो याच्याशी झाला.

# दोन तृतीयपंथीय डॉक्टर म्हणून सेवेत रुजू

## ऐतिहासिक कामगिरीचे सर्वत्र कौतुक


आधुनिक केसरी न्यूज

आदिलाबाद : तेलंगणातील दोन तृतीयपंथीयांनी सर्व आव्हानांना तोंड देत त्यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि राज्यातील सरकारी सेवेत सामील होणारे पहिले ट्रान्सजेंडर डॉक्टर बनून इतिहास रचला आहे. प्राची राठौर आणि रुथ जॉनपॉल अशी दोन्ही ट्रान्सजेंडर डॉक्टरांची नावे आहेत. या दोन्ही डॉक्टरांनी नुकताच शासकीय उस्मानिया सामान्य रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे. प्राची राठोड हिला तृतीयपंथी असल्यामुळे शहरातील एका सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने नोकरीवरून काढून टाकले होते. प्राची राठोडने 2015 मध्ये आदिलाबादच्या मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पूर्ण केले. पीटीआयशी बोलतान त्यांनी प्रतिक्रिया देत सांगितलं की, लहानपणापासून सामाजिक कलंक आणि भेदभाव याचा दृष्टीने लोक आमच्याकडे पाहायचे. मी डॉक्टर झाल्यानंतरही अनेक लोकांनी भेदभाव केला. प्राची राठोड पदव्युत्तर शिक्षणासाठी दिल्लीला गेली होती, पण प्रतिकूल परिस्थितीमुळे तिलान पुन्हा हैदराबादला परतावे लागले. हैदराबाद येथील रुग्णालयात कार्यरत असताना प्राचीने इमर्जन्सी मेडिसिनचा डिप्लोमा केला. शहरातील एका सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये तीन वर्षे काम केले. पण प्राची तृतीयपंथी असल्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रूग्णांची संख्या कमी होऊ शकते असं हॉस्पिटलला वाटलं. त्यामुळे प्राचीला रुग्णालयातून काढून टाकण्यात आलं आहे. त्यानंतर एक गैर-सरकारी संस्था त्यांच्या मदतीसाठी पुढे आली आणि प्राचीला या NGO च्या क्लिनिकमध्ये नोकरी मिळाली. त्यानंतर आता प्राचीला स्मानिया सामान्य रुग्णालयात (OGH) नोकरी मिळाली. प्राचीचे लहानपणी डॉक्टर होण्याचे स्वप्न होतं, पण इतर विद्यार्थ्यांच्या टोमण्यांवर मात करत 12वीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. प्राचीने यावर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे



की, 'ती खरंच खूप वाईट वेळ होती. डॉक्टर होण्याचा विचार करण्याऐवजी आयुष्य कसे जगायचे आणि या गोष्टींवर मात कशी करायची हा मोठा प्रश्न होता.' तृतीयपंथीयांना येणाऱ्या अडचणींचा संदर्भ देत तिने पुढे सांगितले की, नोकरी आणि शिक्षणात काही आरक्षण दिल्यास या समाजाला जीवनात पुढे जाण्यास मदत होईल.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी


असं म्हटलं जातं की आपल्याला आयुष्यात जे काही मिळतं ते बऱ्याच वेळा आपल्या योग्यतेपेक्षा जास्त असतं. जो त्याबद्दल कृतज्ञ असतो, त्याला अधिकाधिक मिळत जाते. स्वामी विवेकानंद म्हणतात ' तुम्ही जसा विचार कराल, तसे तुम्ही घडता. तुम्ही स्वतःला शक्तिमान समजाल तर शक्तिवान व्हाल. स्वतःला दुर्बल समजाल तर तसेच व्हाल. ' म्हणून आपल्या आयुष्यातील नकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित न करता किंवा त्याबद्दल दैवाला दोष देत राहण्यापेक्षा आपल्याला मिळालेल्या चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यामुळे ' लॉ ऑफ अट्रॅक्शन ' च्या तत्वानुसार त्या गोष्टी तुमच्याकडे यायला सुरुवात होईल.

कृतज्ञता ही प्रेमाची सख्खी बहीण आहे. त्या दोन्ही हातात हात घालून चालतात. मुकी जनावरं सुद्धा किती कृतज्ञ असतात ! आपल्या



मालकावर किती प्रेम करतात, त्याच्यासाठी जीव द्यायला तयार होतात. आपण तर सारासार विचार करू शकणारी माणसं आहोत. ' नटसम्राट ' मधील अप्पासाहेब बेलवलकर. म्हातारपणी आपली सगळी संपत्ती मुलांना वाटून टाकतात. पण मुले कृतघ्न निघतात. त्यांच्यावर नको नको तो आळ,संशय घेतात. शेवटी दोघे घराबाहेर पडतात. अप्पासाहेबाना शेवटी सांभाळतो तो एक साधा बूट पॉलिश करणारा मुलगा. मुलांना जेव्हा आपली चूक कळते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. अमिताभ बच्चन आणि हेमा मालिनीचा ' बागबान ' हा चित्रपट अशाच कथानकावर आधारित आहे. जिथे कृतज्ञता, प्रेम संपले तिथे माणुसकी संपली. म्हणूनच आपल्याला धन्यवाद द्यायचे आहेत आपल्याला इथपर्यंत पोहोचवणाऱ्या, आपल्याला हरघडी मदत करणाऱ्या सगळ्यांना. धन्यवाद द्यायचे आहेतते आपल्याला सगळे काही देणाऱ्या विधात्याला. आयुश्यात थोडं थांबून कृतज्ञतेच्या फुलांचा सुगंध अनुभवायलाच हवा. चांगुलपणाचे, कृतज्ञतेचे चक्र सदैव फिरत राहायला हवे.

## आनंदी पहाट



### वक्तृत्वाचा प्रभाव अधिक

आधुनिक केसरी

प्रत्येक व्यक्ती जन्मतः वेगळी, विशेष असते. प्रत्येकाच्यात एक वेगळी खासियत असते; जिच्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे असतो. हा वेगळेपणाच ठरवतो कि आपण कोण आहोत, कसे आहोत, एखाद्या परिस्थितीत आपण कसे वागतो? गरज असते ती आपली अंतर्गत क्षमता जागवण्याची आणि व्यक्तिमत्व



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुधारण्याची. व्यक्तिमत्व विकासामुळे आळस, अनुत्साह आणि निरसतेमध्ये अडकलेली व्यक्ती कार्यक्षम, उत्साही, प्रसन्न आणि आपल्या ध्येयानं प्रेरित होऊ लागते. व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेमध्ये व्यक्ती आपल्या वैशिष्ट्यांना कोणत्याही प्रतिकाराशिवाय, आपल्या सीमांच्या बंधनांचा त्याग करणे शिकत असते. आनंदी राहणे शिकत असताना सर्व काही अधिक उत्साहानं, चैतन्यानं करू लागत असल्याचं दिसून येतं. प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक गुण असतात; त्यातील काही गुण इतरांसारखे देखील असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे, निराळे असतात. खरं तर ह्या वेगळ्या गुणांमुळेच ती व्यक्ती ओळखता येते. म्हणूनच, व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीमधील वैविध्यपूर्ण गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्णसंच होय. व्यक्तिमत्व विकास हि एक व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये, शारीरिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, आत्मिक विकास अशा अनेक बाबींचा समावेश असल्याचं दिसून येत असतं. सध्याच्या २१ व्या शतकात व्यावसायिक क्षेत्रात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फक्त उच्च शिक्षण असून चालत नाही; त्यासोबत आपल्यातील आत्मविश्वास सुद्धा महत्वाचा ठरत असतो. आपल्या व्यक्तिमत्वाचा किती प्रभाव पडतो, ह्यावर आपल्या कामाचा आलेख ठरविला जात असतो. आपण कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात काम करत असताना आपल्या वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव पडत असतो.

## सिंहावलोकन

आधुनिक केसरी

वर्तमान सुखात असेल तर आपण भूतकाळात सहसा डोकावत नाही .परंतु वर्तमान का सुखात आहे यासाठी भूतकाळात कधीतरी थोडसं डोकवावं, सिंहलोकन करावं. बालवयात खूप काही चांगलं करत होता पण आता पैसा आला आणि सगळंच विसरला असं कोणी म्हणायला नको. उलट असं कोणी म्हटलं की लहानपणी फारच खोडकर होता आणि आता खूपच सुधारला, खूप हुशार झाला, मनमिळावू आहे.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-51

उलट बाल वयात बऱ्याच गोष्टी माफ होतात .पण मोठे झाल्यावर नाही. चुका कोणी पदरात घेत नाही. घेतात फक्त लहानपणी. आणि तेही फक्त आईच आपल्याविषयी कोणी बोलताना त्यांच्या भुवया उंचावल्या पाहिजे. चेहऱ्यावर आनंद दिसला पाहिजे. फुलांच्या सुगंधाप्रमाणे कार्याचा सुगंध पसरावा. अर्थात सगळेच नाही कौतुक करू शकत. कारण प्रत्येकांच्या विचारधारा वेगवेगळ्या असतात. कोणाला स्वतःसाठी सर्व काही करायला आवडतं. तर कोणाला फक्त आणि फक्त दुसऱ्यांसाठी करायला, जगायला आवडतं. दुसऱ्यांना आनंद देता आला पाहिजे. समोरच्याला पण तो घेता आला पाहिजे .आपली परिस्थिती वाईट असताना आपल्याला वीस रुपयाची झालेली मदत सुद्धा खूप मोठी असते. आज तुमच्याकडे 20 लाख रुपये असतील त्याला महत्त्व नाही. पण त्यावेळी मिळालेल्या वीस रुपयाच्या नोटेला महत्त्व आहे. खूप किंमत होती त्या नोटेला. त्या कागदाला किंमत नसेल पण त्या देणाऱ्या हाताला किंमत आहे. त्या व्यक्तीला किंमत आहे. त्या दातृत्वशील हाताला कधीही विसरू नका. आज तुम्ही 20 कोटीचे मालक आहात. पण संकटात कोणी तुम्हाला 20 पैसे लवकर दिले नसतील. त्यावेळी भूक तुम्हाला डंख मारत होती. पोटाचा भडका होत होता. अशावेळी दानशूर व्यक्ती तुम्हाला शांत करत होती. तुमच्या आगीवर फुंकर मारत होती . तेव्हा त्या व्यक्तीला, त्या माणुसकीला, त्या प्रेमाला आपण विसरता कामा नये.

20 रुपयाच्या त्या मदतीने आज तुम्ही 20 कोटीचे धनी झालात. तेव्हा भुकेल्यांना अन्न आणि तहानलेल्यांना पाणी द्यायला विसरू नका. आपलं सिंहावलोकन करा.

चांगल्या ,वाईट दोन्ही गोष्टींचे. वाईट गोष्टी वेळीच डिलीट करा....

## महर्षी सांदिपनी

आधुनिक केसरी

महर्षी सांदिपनी हे भगवान श्रीकृष्णांचे गुरु होते. कृष्ण आणि बलराम हे दोघे बंधू शिक्षण घेण्यासाठी मथुरेहून उज्जयिनी इथे आले होते. महर्षी सांदिपनी यांनीच कृष्णाला ६४ कलांचे शिक्षण दिले होते. कृष्णाने या कला ६४ दिवसांत शिकल्या होत्या. मध्यप्रदेशातील उज्जैन शहरात आजही सांदिपनी ऋषींचा आश्रम आहे. सांदिपनी ऋषीं हे फक्त गुरुच नाही तर एक महान तपस्वी पण होते. मथुरेत कंसाचा वध केल्यानंतर भगवान कृष्णाला वसुदेव आणि देवकी यांनी शिक्षणासाठी अवंतिका नगरी इथे गुरु सांदिपनी यांच्या आश्रमात पाठवले. शिक्षण झाल्यावर जेव्हा गुरूदक्षिणेची वेळ आली तेव्हा सांदिपनी म्हणाले की कृष्णा मी तुझ्याकडे काय मागू? या जगात असे काहीही नाही जे मी तुझ्याकडे मागितल्यावर तू मला आणून देऊ शकणार नाहीस. कृष्ण म्हणाला की तुम्ही काहीही मागा, मी तुम्हाला आणून देईन. तेव्हाच गुरुदक्षिणा पूर्ण होईल. गुरु सांदिपनी म्हणाले की शंखासूर नावाचा एक दैत्य माझ्या पुत्राला घेऊन गेला आहे. त्याला परत आणून दे. कृष्णाने गुरुना त्यांचा पुत्र परत घेऊन येण्याचे वचन दिले आणि बलराम सोबत पुत्राला शोधायला निघाला. शोध घेत ते समुद्र किनाऱ्यावर आले. समुद्राला विचारल्यावर तो म्हणाला की पंचज जातीचा एक दैत्य शंखाचे रूप घेऊन समुद्रात लपला आहे. कदाचित त्यानेच तुमच्या गुरुपुत्राला खाल्ले असेल. कृष्णाने समुद्रात जाऊन शंखासूराला मारून त्याच्या पोटात गुरुपुत्राचा शोध घेतला, परंतु तो तिथे मिळाला नाही. तेव्हा कृष्ण शंखासुराच्या शरीराचा शंख घेऊन यम लोकात गेला. यमाकडून आपला गुरुपुत्र परत घेतला आणि संदिपनीना परत नेऊन दिला आणि आपली गुरुदक्षिणा पूर्ण केली.

## “निरुपण”

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

### भक्ती

**सदा सोबती तू कृपाकारिणी तू**
**न लागे तुला सांगणे रेणुकांबे**
**हिता जाणते तू सुताच्या सदा हो ।**
**तुझे लक्ष माझ्याकडे नित्य राहो**
**मला पामराला तुझी ओढ लागो ।।**

## भगवंताची कृपा



आधुनिक केसरी

खरोखर, भगवंताच्या कृपेशिवाय बाकी गोष्टी असून वा नसून सारख्याच आहेत. एखादी मुलगी लग्न होऊन सासरी गेली; तिथे सासू, सासरा, दीर नणंद, जावा वगैरे सर्व लोकांशी तिचे चांगले आहे पण नवर्याशी मात्र पटत नाही, तर तिला खरे सुख समाधान मिळणार नाही. परंतु, समजा, नवर्याशी चांगले आहे पण इतरांशी तितकेसे ठीक नाही, तर तिचे अडणार नाही. तसेच एकाद्याच्या आजारात पैसा, डॉक्टर, औषधे, माणसांची मदत वगैरे सर्व गोष्टी अनुकूल आहेत, पण त्यात भगवंताच्या कृपेचा हात नसेल तर सर्व व्यर्थ आहे. याच्या उलट, भगवंताची कृपा आहे, पण इतर गोष्टींचा अभाव आहे, तरी काम भागते. म्हणून सर्व बाबतीत भगवंताच्या कृपेची गरज आहे; आणि ती मिळविण्याकरिता, त्याचे स्मरण हाच एक मार्ग आहे. समजा, एखादी कुरूप मुलगी आहे. पुष्कळ ठिकाणी तिला दाखविली पण ती नापसंत झाली; नंतर एकाने तिला पाहिली आणि एकदम पसंत आहे म्हणून सांगितले. ती पसंत झाली की सौभाग्याचे सर्व गुण जसे तिच्यामध्ये येतात, त्याप्रमाणे ज्याच्यावर भगवंताची कृपा झाली त्याचे काम पूर्ण झाले; मग त्याने किती पाप आणि पुण्य केले आहे हे कोण पाहतो ! भगवंताची कृपा सर्वांवर, अर्थात् आपल्यावरही आहेच. आपल्यावर कृपा आहे अशी आपली खात्री झाली की ती प्रकट होते. कृपा म्हणजे भगवंताशी एकरूपताच. ' मी पिईन तर आईचेच दूध पिईन ' असे म्हणून वासरू गाईला ढुसण्या मारते आणि गाय त्याला पाजते; त्याप्रमाणे आपण भगवंताशी अनन्यतेने वागले आणि त्याचे नामच मागितले तर तो कृपा करतोच करतो. आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची खरी कृपा नसून, असेल त्या परिस्थितीमध्ये आपले समाधान टिकणे ही त्याची खरी कृपा होय. 'भगवंता ! तू माझ्यावर कृपा कर,' असे सांगणे म्हणजे 'मी कृपेला लायक नाही त्या माझ्यावर तू कृपा कर' असे म्हणण्यासारखेच आहे. जो लायक नाही त्याच्यावर कृपा कशी होईल ? ज्याप्रमाणे डोंगरावर आपण शब्द काढला तर त्याला उत्तर म्हणून आपलाच शब्द प्रतिध्वनिरूपाने येतो, त्याप्रमाणे भगवंताच्या प्रार्थनेचा प्रतिध्वनी त्याच्या कृपारूपाने येतो. भगवंताच्या कृपेनेच त्याचे नाम आपल्या मुखात येते. भगवंताची कृपा आपल्यावर आहेच असे म्हणावे. ती काम करीत असतेच, आपणच आपल्या शंकेने ती झाकून टाकू नये. पुष्कळ केलेले देखील शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरले की आपली वृत्ती निःशंक होते. जे भगवंताचे आहेत ते अहेतुक नाम घेतात.

**आजचे बोधवचन आहे** – ३११. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नामच तेवढे आहे.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**मना अल्प संकल्प तो ही नसावा।**
**सदा सत्य संकल्प चित्ती वसावा।**
**जनी जल्प विकल्प तो ही तजावा।**
**रमाकांत येकांतकाळी भजावा।।१३०।।**

**श्लोकार्थ :** हे मना, संकुचित स्वरूपाचा संकल्प करू नकोस. नेहमी विशाल, उदार आणि ब्रम्हाचा संकल्प करीत जा. समाजात उगाचच वादविवाद, शंका घेणे टाळावे आणि एकांतात भगवंताचे नामस्मरण करावे.

**विवेचन :** मनुष्याच्या मनात सतत विचारचक्र चालू असते. ते विचार कधी चांगले तर कधी अत्यंत वाईट असतात. मनुष्य जात्याच स्खलनशील असल्यामुळे मनुष्याच्या मनात नकारात्मक विचारांचे प्राबल्य जास्त असते. नकारात्मक विचार मनात ठाण मांडून बसतात. त्यामुळे सकारात्मक विचार करा, असे मनुष्याला वारंवार सांगावे लागते. अर्थात,

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

चांगला विचार मनात येणे, तो टिकणे, रुजणे तसे कष्टाचेच. बघा ना ! मद्य प्राशन कसे करावे ?, यासाठी कोणतीही शाळा नाही, तरीही आपल्याकडे मद्याची निर्मिती सर्वात जास्त आणि मद्याच्या विक्रीत दरवर्षी विक्रमी वाढ होत आहे. समाजपुरुषाचा विचार केला तर हे घातक आहे, नाही का गोपालक श्रीकृष्णाच्या देशात खरेतर दुधाचा महापूर असायला हवा, परंतु सध्याचा दारूचा आणि व्यसनाधीनतेचा महापूर आला आहे असे खेदाने नमूद करावेसे वाटते.

जग म्हटलं की त्यात घडामोडी घडणार...., कधी पंच महाभूते तांडव करणार, तर कधी राजकीय उलथापालथ होणार... कधी मनुष्याला प्रापंचिक अडचणी येणार तर कधी सामाजिक, कधी व्याधी होणार तर कधी अन्य काही...... त्यातील कोणत्या गोष्टीला किती प्राधान्य द्यायचे हे मनुष्याने विवेकाने ठरवायला हवे. अनेक गोष्टींशी आपल्याशी थेट संबंध नसतो, अनेक गोष्टी आपण दुर्लक्षित करू शकतो, जे शक्य आहे, ते मनुष्याने अवश्य करावे. आपली वृत्ती बिघडणार नाही इतकेच लक्ष मनुष्याने अशा घडामोडीत घालावे, म्हणून श्रीसमर्थ म्हणतात, "जनी जल्प विकल्प तो ही तजावा". मनुष्याने कोणताही विकल्प मनी न धरता सत्य संकल्प अर्थात भगवंत प्राप्तीचा संकल्प करावा.

मनुष्य चांगला संकल्प कशाला म्हणतो ? तर आपली भौतिक प्रगती व्हावी, मूलबाळ, मुबलक संपत्ती, घरदार, नोकर-चाकर, मानमरातब अशा सर्व गोष्टी सहज प्राप्त व्हाव्या असे मनुष्याला वाटते. हे पूर्णपणे चुकीचे आहे, असे म्हणता येणार नाही, पण यातून भौतिक गोष्टीतून मिळणारा सुख टिकणारे नाही हे सुध्दा मनुष्याने लक्षात घ्यायला हवे. तात्कालीक सुखापेक्षा चिरंतन टिकणारे समाधान जास्त मोलाचे नव्हे काय ? समर्थ सत्य संकल्पा विषयी म्हणतात, "सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐशिया द्वैताचा जल्प । मनचि करी ॥" (दा. ०७.०५.०४)

भगवंताचे चिंतन करायला एकांत चांगला कारण तिथे आपला आपल्याशी संवाद होतो. Two is company, Three is croud. अशी एक इंग्रजी म्हण आहे. एक भगवंत आणि एक आपण असा उत्तम संवाद होऊ शकतो. याची अंतिम पायरी म्हणजे एकाचाही अंत होणे. अर्थात परमेश्वर आणि मी एकच आहोत याची अनुभूती येणे. जेव्हा आपण एकांतात असतो तेव्हा सुद्धा आपण एकटे नसतो. आपले मन ( गीतेत भगवंतांनी मी मन आहे असे म्हटले आहे ) आपल्या सोबत असते, तेव्हा त्याच्याशी उत्तम रीतीने संवाद होऊ शकतो. मनुष्याला 'एकटेपणा'पेक्षा 'एकाकीपणा'ची जास्त भीती वाटते. ज्याला एकाकीपणाची भीती वाटते त्याने 'एकटे' पडण्यापूर्वी भगवतांशी मैत्री करावी, असे सर्व संत सांगतात. * घरात भरपुर माणसे असल्याने एकांत मिळत नाही अशी सबब सांगणारे, तसेच जेव्हा घरातील सर्वजण बाहेर गेले म्हणून ज्याला घर खायला उठते, त्याने एकांत स्थळी न जाता, घरात राहूनच एकांताचा अभ्यास करावा. त्यांनी नेमके आणि मोजके बोलावे. मनुष्य घरात एकटा असताना नक्की काय करतो यावे त्याची अध्यात्मिक प्रगती किती झाली आहे हे त्याला तपासून पाहता येऊ शकते.

# न्यायवृंद व्यवस्था पारदर्शकच; ती कोलमडून पडू नये

## सर्वोच्च न्यायालयाचे मत

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालय हे सर्वात पारदर्शक कार्यशैली असलेल्या संस्थांपैकी एक आहे. विद्यमान न्यायवृंद व्यवस्था (कॉलेजियम) ही एखाद्याच्या अधिक्षेपामुळे रुळावरून घसरून विस्कळीत होऊ नये, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. न्यायव्यवस्थेत न्यायाधीशांच्या नियुक्तीसंदर्भात सध्या असलेल्या न्यायवृंद व्यवस्थेवरून असलेले मतभेद तसेच यावरून न्यायालयाचा सरकारशी तीव्र होत चाललेला संघर्ष या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, की न्यायवृंद व्यवस्थेचे सदस्य म्हणून काम पाहिलेले सर्वोच्च न्यायालयाचे काही माजी न्यायमूर्ती आता या नियुक्ती व्यवस्थेबद्दल कोणते मत प्रदर्शित करत आहेत, यावर आपल्याला भाष्य करायचे नाही. न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि सी.टी. रविकुमार यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले, की, सध्या पूर्वीच्या न्यायवृंदाच्या निर्णयावर त्या न्यायवृंदात सहभागी असलेल्यांनी भाष्य करण्याची एक 'फॅशन'च बनली आहे. त्यांच्या टिप्पण्यांवर आम्हाला काहीही भाष्य करायचे नाही. फक्त सध्या अस्तित्वात असलेली न्यायवृंद व्यवस्था रुळावरून घसरता कामा नये. ही व्यवस्था काही 'व्यस्त' व्यक्तींच्या अधिक्षेपानुसार काम करत नाही. न्यायवृंद व्यवस्थेला आपले कर्तव्य बजावू द्या. सर्वात पारदर्शक संस्थांपैकी एक अशी आपली ओळख आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध माहिती अधिकार कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च



न्यायालयाने हे मत व्यक्त केले. न्यायालयाने ही याचिका फेटाळली. या याचिकेत १२ डिसेंबर २०१८ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाच्या बैठकीचा तपशील मागण्यात आला होता. तेव्हा काही न्यायाधीशांना सर्वोच्च न्यायालयात बढती देण्यात आल्याचे निर्णय कथितरीत्या घेण्यात आले होते. भारद्वाज यांची बाजू मांडणारे वकील प्रशांत भूषण म्हणाले, की सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मदन लोकुर हे २०१८ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाचे सदस्य होते. त्यांनी सार्वजनिकरीत्या असे सांगितले होते, की १२ डिसेंबर २०१८ रोजी झालेल्या न्यायवृंदाच्या बैठकीत झालेले निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जावेत. १२ डिसेंबर २०१८ रोजी तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालील न्यायवृंदात न्या. लोकूर यांच्यासह ए. के. सिक्री, एस. ए. बोबडे, एन. व्ही रमणा (सर्व सेवानिवृत्त) यांचा समावेश होता. या बैठकीत सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची नियुक्ती, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्तींच्या बदल्यांसंदर्भात निर्णय घेण्यात आले. परंतु हे निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसृत करण्यात आले नव्हते. त्यानंतर १० जानेवारी २०१९ रोजी लोकूर यांच्या निवृत्तीनंतर या न्यायवृंदात बदल करण्यात आला. या न्यायवृंदाने दिनेश माहेश्वरी आणि संजीव खन्ना यांना बढती देण्याची शिफारस केंद्राला केली. त्यावेळी असे नमूद केले, की याआधी १२ डिसेंबर २०१८ रोजी करण्यात आलेल्या शिफारशींना अंतिम मानले जाऊ नये. कारण या निर्णयांचा पुनर्विचार करायचा निर्णय आम्ही घेतला आहे. १० जानेवारीच्या बैठकीत न्यायवृंदाने उपलब्ध अतिरिक्त माहितीच्या आधारे आधीच्या शिफारशींवर पुनर्विचाराचा निर्णय घेतला आहे.

# मोदींना रावण म्हटल्याने तुमची अस्मिता जागी होते, मग शिवरायांच्या अपमानावर थंड का?

## शिवसेनेचा भाजपवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुजरातच्या निवडणूक प्रचारात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना 100 तोंडी रावण म्हटल्यानंतर भाजपने गुजरातचा व गुजरातच्या सुपुत्राचा अपमान असल्याचे म्हटले. मात्र, जर मोदींना रावण म्हटल्याने गुजराती अस्मितेचा अपमान ठरत असेल तर छत्रपती शिवरायांचा अपमान करणाऱ्यांना 'भाजप' पाठीशी घालते, त्यांचा बचाव करते यास काय म्हणावे? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. भाजपचे शिवप्रेमाचे ढोंग रोज उघडे पडत असल्याची टीका शिवसेनेने केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र 'सामना'च्या अग्रलेखातून आज पुन्हा एकदा भाजपवर निशाणा साधण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आज सामनाच्या अग्रलेखातून भाजपवर सडकून टीका करण्यात आली. भारतीय जनता पक्ष हा नक्की किती तोंडी नाग आहे? त्यावर आता नव्याने संशोधन करायला हवे. एखाद्या विषयावर हवे तेव्हा वळवळायचे किंवा फूत्कार सोडायचे व नको असेल तेव्हा बिळात घुसायचे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमान प्रश्नी भाजप नेमके हेच करत असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे.

महसूलमंत्री विखे पाटील यांनी राज्यपालांचा बचावासाठी केलेल्या वक्तव्याचा शिवसेना ठाकरे गटाने समाचार घेतला आहे. कोश्यारींविरोधात लोकभावना भडकविण्याचा विरोधकांचा डाव असल्याचे विखे पाटलांनी सांगितले. विखेंनी असे बोलणे हा महाराष्ट्राच्या लोकभावनेचाही अपमान असल्याचे शिवसेनेने म्हटले. राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपतींच्या संदर्भात अपमानास्पद विधाने करावीत हे विखे पाटील सहन करू शकतील. सध्या ते ज्या पक्षात आहेत, त्या पक्षाचे हे धोरण असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे. राज्यपालांविरुद्ध लोकभावना भडकलेल्याच आहेत. त्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज नाही, महाराष्ट्राचे वरिष्ठ मंत्री अपमानाचे समर्थन करत असल्याचे दुःख असल्याचे शिवसेना ठाकरे गटाने म्हटले.



**मोदींवरील टीकेवर आक्रमक, मग शिवरायांबाबत थंड का?**
काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांनी गुजरात निवडणूक प्रचारात पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका करताना त्यांना रावण असे संबोधले होते. त्यानंतर भाजपने काँग्रेसविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. शिवसेनेने म्हटले की, मोदींना रावणाची उपमा देणे हा गुजरातचा व गुजरातच्या सुपुत्राचा अपमान असल्याचे जाहीर सभांतून ढोल-नगारे वाजवून सांगण्यात येत आहे. गुजराती जनतेने मोदींच्या अपमानाचा बदला घेतला पाहिजे असे मोदी सांगू लागले. पंतप्रधानांचा अपमान करणे हे चूकच आहे. मात्र जर मोदींना रावण म्हटल्याने गुजराती अस्मितेचा अपमान ठरत असेल तर छत्रपती शिवरायांचा अपमान करणाऱ्यांना 'भाजप' पाठीशी घालते, त्यांचा बचाव करते यास काय म्हणावे? असा सवाल शिवसेनेने केला.

# मुंबईत आजपासून जमावबंदी, 15 दिवसांसाठी आदेश लागू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई पंधरा दिवसांच्या कालावधीसाठी जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आला आहे. ही जमावबंदी 3 डिसेंबर ते 17 डिसेंबर रोजी रात्रीपर्यंत लागू असेल. पोलीस सूत्रांना मिळालेल्या माहितीनुसार काही कारणाने कायदा आणि सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्यामुळे हा जमावबंदीचा आदेश जारी करण्यात आला आहे. जमावबंदी असेल मात्र संचारबंदी नसेल. पोलिसांना सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या कालावधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून मुंबईत जमावबंदी लागू करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी 3 डिसेंबर ते 17 डिसेंबर या कालावधीत मुंबई शहरात कलम 144 लागू केलं आहे. या कालावधीत पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास परवानगी नाही. याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलं आहे. मुंबई पोलिसांच्या मिशन विभागाचे उपायुक्त विशाल ठाकूर यांनी सांगितलं की, मुंबई शहरात 3 डिसेंबर ते 17 डिसेंबर या कालावधीत लाऊडस्पीकर, मिरवणूक आणि मेळावे घेण्यास बंदी आहे. जमावबंदी आदेश म्हणजे पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचे एकत्र येण्यास बंदी. जमावबंदीच्या आदेशामध्ये खासगी, सार्वजनिक ठिकाणांचा समावेश




होतो. जमावबंदीचे आदेशही फौजदारी दंड संहितेच्या 144 कलमान्वये जारी केले जातात. कायदा आणि सुव्यवस्था उद्भवण्याची परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, एखादा अपघात किंवा नागरिकांच्या जीवाला धोका पोहोचेल अशा कृतीला आळा घालण्यासाठी जमावबंदी आदेश लागू केला जातो. दरम्यान, नागरिकांनी लक्षात घ्यावं की, मुंबईत शहरात जमावबंदी लागू करण्यात आली आहे, संचारबंदी नाही. जमावबंदी आणि संचारबंदी यामध्ये फरक आहे. संचारबंदीमध्ये लोकांच्या घराबाहेर पडण्यावर निर्बंध लागू केले जातात. ह्या काळात लोकांवर घरात राहण्याची कायदेशीर सक्ती असते. तर, जमावबंदी आदेशादरम्यान नागरिकांनी घराबाहेर पडण्यावर निर्बंध नसतात, केवळ पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यावर निर्बंध असतात.

# ज्या दिवशी शेतकरी आत्महत्या करणे बंद करेल त्या दिवशी महाराष्ट्र एक नंबर होईल

## अभिनेता नाना पाटेकर

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबासाठी वैयक्तिक पातळीवर काय करता येईल याचा प्रत्येकाने विचार करायला हवा, असे मत यांनी व्यक्त केले. सरकार त्यांच्या बाजूने जे करायचे ते करत राहील. मात्र, आपल्याला काय करता येईल हे पाहायला हवे. ज्या दिवशी महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करणे बंद करेल, तेव्हा महाराष्ट्र एक नंबरचे राज्य होईल असेही नाना पाटेकर यावेळी म्हणाले. नागपूरात शुक्रवारी खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे थाटात उदघाटन नाना पाटेकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरींसह अन्य नेते उपस्थित होते.

ऋतुचक्र खूप बदलले आहे. शेतकऱ्यांनी नेमके कशाच्या आधारावर जगायचे हे कळत नाही असेही पाटेकर म्हणाले. आपल्याकडे मार्केट तज्ज्ञ पाहिजे, कारण शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतल्यावर त्याला फायदा होईल हे कळायला हवे. ज्या दिवशी राज्यातील शेतकरी आत्महत्या करणे बंद करेल तेव्हा महाराष्ट्र एक नंबरचे राज्य होईल असेही नाना पाटेकर म्हणाले. आता पारंपारिक पद्धतीनं शेती करुन फायदा होत नाही हे लक्षात आल्यावर शेतकऱ्यांनी शेती करण्याची पद्धत बदलली पाहिजे असे पाटेकर म्हणाले.

शेतकऱ्यांच्या मुलांनी स्थलांतर करुन शहरात जाऊ नये शेतकऱ्यांच्या मुलांनी गावातून स्थलांतर करुन शहरात जाऊ नये. जिथे आहे तिथे आपली जमीन न विकता राबायला तिथे राबायला पाहिजे असे पाटेकर म्हणाले. स्थलांतर पूर्णपणे बंद होणे गरजेचे आहे. आता लोकसंख्या वाढली आहे. मात्र, जमीन तेवढीच आहे. बाकीच्या सगळ्या विषयांवर आपण बोलत असतो, पण लोकसंख्येच्या बाबतीत आपण का बोलत नाही? ही सगळ्यात मोठी समस्या असल्याचे पाटेकर म्हणाले. गावात काही गोष्टी टिकून आहेत मात्र, शहरात ऐकमेकांकडे पाहायला देखील वेळ नाही. फार दयनीय अवस्था असल्याचे पाटेकर म्हणाले.

मी शहरात राहणे बंद केले केले आहे. मला शहरात श्वास घेता येत नाही शहरात. मी खेड्यात राहतो. मोठमोठ्या इमारती, गाड्या बघितल्या की मला भीती वाटते असे नाना पाटेकर म्हणाले. आपणचे एकमेकांना सांभाळणे गरजेचे आहे. राजकारणावर मला बोलायचे नसल्याचे ते म्हणाले. आपण पुन्हा पुन्हा चक्रुव्युहात अडकत आहोत. एकादा भ्रष्ट अधिकारी असेल तर आपण सगले का त्याच्याविरोधात नाही बोलत. तो एक असतो आपण सगळे असतो तरीही बोलत नाही. हे शक्य होईल पण त्यासाठी सर्वांनी एक झाले पाहिजे असे नाना पाटेकर म्हणाले. राज्यकर्त्यांनी बांधलेल्या भिंती तोडा तुम्ही सगळे एकत्र या असे आवाहन पाटेकर यांनी केले.





प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# सर्वसमावेशक राजकारण

आधुनिक केसरी

**हल्लीचा काळ एकांगी राजकारणाचा नाहीच. आपल्या अशा विचारसरणीमुळे आपल्याच राजकीय पक्षाचे आपण नुकसान करत आहोत, हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतरही काँग्रेसने आपल्यात सर्व विचारसरणींना सामावून घेतले होते. यात डावे- उजवे, धार्मिक- अधार्मिक, मवाळ- कडवे, हिंदी- अहिंदी आणि बरेच काही भेद असणारी राजकीय व्यक्तिमत्वे काँग्रेसअंतर्गत फुलली-फळली. सर्व विचारांच्या मंडळींना घेऊन चालणे हे आव्हानात्मक असते. त्यासाठी विस्तीर्ण मन आणि सर्वांभूती समत्वदृष्टी असणे गरजेचे असते, ही पूर्वअट होय.**

आज बीजेपीची लाट आहे आणि त्यामुळे इतर राजकीय पक्षांची पिछेहाट होताना दिसते, असा अनेकांचा कयास असतो, परंतु ही लाट निर्माण होण्यासाठी संपूर्ण सागराच्या पाण्याला कवेत घेण्याचे कौशल्य अगोदर अंगिकारणे व तेवढा विश्वास निर्माण करणे महत्त्वाचे असते. त्याशिवाय लाट निर्माण होणार नाही. पक्षीय राजकारणात साचेबद्धपणा येऊ लागला की वेगळ्या विचारांच्या मंडळींची गळचेपी होते आणि घुसमट वाढते. काही काळापूरते असे वातावरण अनेकांना बरेही वाटण्याचा संभव आपण नाकारू शकत नाही, पण ते काही अवधीसाठीच. नंतर मात्र आतूनच पक्ष फुटण्याची प्रक्रिया सुरू होते. पक्ष फुटीला केवळ एवढेच एक कारण कारणीभूत नाही, तर पक्षांतर्गत असणारी लोकशाही ही निर्णय प्रक्रियेवर प्रभाव पाडणारी असते. केवळ दिखावू लोकशाही मूल्यांमुळे समाजाचे नंतर नुकसान होईल, पण आपले नुकसान अगोदरच होणार हे राजकीय पक्षांनी लक्षात घ्यायला हवे. सर्वदूर आणि सर्वव्यापी राजकारण करायचे असल्यास लोकशाहीत लोकशाहीच्याच मूल्यांची जपवणूक होणे आणि ती आपल्या जगण्याचा भाग बनणे अतिशय महत्त्वाचे आहे. आपण एकीकडे लोकशाहीचे गोडवे गायचे, लोकशाहीची मधूर फळे चाखायची आणि दुसऱ्यासाठी मात्र हुकूमशहा बनून रहायचे. हे विसंगत, दुतोंडी आणि बेगडीपणा आपलाच राजकीय विचार एकदिवस बुडवणार हे नक्की. कोणतीही विचारधारा द्विमूल्यात्मक रीतीने तिचे कार्य चालू ठेवते. एक भाग स्थिर मूल्यांसाठी आणि दुसरा भाग काळानुरूप आपल्यात बदल घडवून आणणाऱ्या मूल्यांसाठी राखीव असलाच पाहिजे, अन्यतः आपण कालबाह्य होऊ. या दोन्हीत संतुलन साधल्याशिवाय पक्षीय विचार पुढे जाणे शक्य नाही. काहीवेळेस काही राजकीय पक्ष आपल्या स्थिर मूल्यांच्या एवढे प्रेमात पडतात की, जग बदलत आहे व त्यानुसार आपली बाह्य मूल्यव्यवस्था देखील बदलली पाहिजे, याकडे साफ दुर्लक्ष करतात. विशेषतः येथील डावी विचारसरणी मागे पडण्याचे हे एक उत्तम उदाहरण होऊ शकते. स्वातंत्र्यपूर्व काळात किंबहुना त्याही आधी आपण कसे होतो, तसेच राहिले पाहिजे तरच आपण डावे म्हणवून घेऊ, अशा पद्धतीचा विचार काळविसंगत ठरतो. समाजात आजही डावी विचारधारा मानणारा, मूल्यभान जोपासणारा मोठा वर्ग असताना देखील डावे राजकारणात याच गोष्टींमुळे मागे पडले. खरेतर खाऊजाच्या धोरणानंतर फिनिक्सप्रमाणे उड्डाण घ्यायला हवे होते. वाढती महागाई, बेरोजगारी, भूकबळी, कुपोषण, कामगारविरोधी कायदे आणि बरंच काही देशांतर्गत घडामोडी चालू असताना डावे कोठे आहेत, असा प्रश्न सामान्यांना पडावा अशी अवस्था. ते मूल्यात्मक धोरणाचा बळी ठरले, एवढेच आपण म्हणू शकतो. काँग्रेसही याच कारणामुळे मागे पडली पण ती तिच्या स्थिर मूल्यात्मक धोरणापासून फारकत घेतल्यामुळे. काळविसंगत विधी तुम्हांस अपयशाचे धनी बनवते तर काळ सुसंगत विचार पुढे जाण्यास मदत करतो. आपण कालाय तस्मे नमः असे म्हणू शकत नाही. काँग्रेस आणि डावे मागे पडण्याची कारणे मूल्यात्मक असली तरी दोन्हीत फरक आहे. डाव्यांसारखेच आज सर्वात वाईट दिवस प्रादेशिक पक्षांना आले आहेत. जे प्रादेशिक पक्ष आपण प्रादेशिक आहोत असे न मानता राष्ट्रीय आहोत अशा अविर्भावात गेली त्यांना वाईट दिवस आले. दाक्षिणात्य प्रादेशिक पक्ष, ममता बॅनर्जी, नवीन पटनाईक आपापली राज्ये सांभाळून आहेत. खंडप्राय देशाचे प्रश्न, समस्या वेगवेगळ्या आहेत. ज्या प्रश्नाला घेऊन आपला जन्म




झाला तो दूर सारून वेगळेच कोलीत हाती घेण्याने काही साध्य होणार नाही. जी महाराष्ट्राची समस्या आहे ती केरळची असणार नाही व जो प्रश्न नागालँडचा आहे तो गुजरातचा असेलच असे नाही. त्यामुळे स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रादेशिक पक्ष महत्त्वाची भूमिका बजावतात. पण यथावकाश सर्वांनाच राष्ट्रीय राजकारणात आपले प्रभुत्व असावे असे वाटू लागते आणि उतरती कळा येऊ लागते. आपण इंग्रजीत लिहिले तरच आंतरराष्ट्रीय वगैरे होऊ अशा स्वरूपाचे हे आहे, पण ते तसे नसते हे सांगणार कोणाला. आपापल्या जवळचा प्रश्न देखील अखिल भारतीयच असतो, कारण आपण एक भारतीय आहोत. कंबरेचे सोडून खुंटीचे घ्यायला धडपडण्यात काय हशील. कोणताही पक्ष धर्म, जात, पंथ, वर्ण, वर्ग, प्रदेश, लिंग आणि व्यवसाय हे पाहून लांगूलचालन करणार नाही, कोणताही पक्ष इतरांवर आगपाखड करण्यापेक्षा नवनिर्माण आणि रचनात्मक कार्यावर भर देईल आणि कोणताही पक्ष सबंध भारतीयांचा भारतीय म्हणून विचार करणार नाही तोपर्यंत तो राजकीय पक्ष सर्वसमावेशक राजकारण करू शकणार नाही. बहुदा वदंती न्यायाने सर्वांचे उद्दिष्ट मात्र सारखे असावयास पाहिजे, अन्यतः आम्ही भारताचे लोक नेहमीच विखुरलेले राहू. हे विखुरलेपण सावडून एकत्र करण्याची किमया ज्याच्यात आहे तो सर्वसमावेशक राजकारणी. अन्य कोणत्याही राजकीय प्रणालीपेक्षा लोकशाहीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे इथे प्रयोगाला वाव असतो. दोन कट्टर विरोधी पक्ष देखील एकत्र येऊन स्थिर सरकार देऊ शकतात. पण असे फार कमी वेळेस घडते. आपण आपले वैयक्तिक राजकारण करण्यासाठी नसून या शाहीमध्ये लोक महत्त्वाचे आहेत, हे कोणीही विसरू नये. लोकांचा राजकारण्यांना पडलेला विसर लोकशाहीसाठी घातक ठरू शकतो. अशा परिस्थितीत लोकही काही करू शकत नाहीत, हे वास्तव आहे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत.)**



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# वाढते रस्ते अपघात चिंताजनक

आधुनिक केसरी

**राज्यात रस्ते अपघातांची संख्या व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या ही अत्यंत गंभीर बाब आहे.राज्यात दिवसेंदिवस रस्ते अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते ही अत्यंत दुखदायी बाब आहे.रोडचे खड्डे, रोडचे बांधकाम यामुळे सर्वसामान्यांना आवागमन करण्यास मोठी अडचण निर्माण होते.त्याचप्रमाणे रोडचे काम सुरू असताना वनवे ट्राफीक असते अशाच ठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्त दिसून येते.**

दिनांक 29 नोव्हेंबर रोज मंगळवारला नागपूर जिल्ह्यातील हिंगणा रोडवरील वानाडोंगरी परिसरात एक अपघात झाला यात दोघे भाऊ कामावर जात असतांना एका टिप्परने धडक दिली व दोघांही भावांचा जागीच मृत्यू झाला.त्याचप्रमाणे दिनांक 29 नोव्हेंबर रोज मंगळवारला नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील खापा या गावी दोघे मोटारसायकलने जात असतांना टिप्परने धडक दिली व एकाचा जागीच मृत्यू झाला व दुसऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.अशाप्रकारे नागपूर जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढल्याचे दिसून येते.याकडे सरकारने व प्रशासनाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.असे अपघात होने हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे. कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या कामानिमित्त किंवा नौकरीवर जात असतो.परंतु वाढते रोडचे अपघात पहाता प्रत्येकामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होने सहाजिकच आहे.यावरून स्पष्ट होते की घरून निघालेला व्यक्ती वापस घरी सुखरूप पोहचेलच याची काहीही गॅरंटी नाही ही बाब सध्याच्या होणाऱ्या अपघातावरून लक्षात येते.कोणताही अपघात असो यात एकालाच दोष देता येणार नाही. वाहन चालकांनी आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असते.त्याचप्रमाणे घरून निघताना हेल्मेट घालुनच निघायला हवे.कारण कोणताही अपघात सांगुन येत नाही.त्यामुळे या धकाधकीच्या जीवनात स्वतःचा जीव स्वतःलाच सांभाळायचा आहे.वाहन चालवितांना दुचाकी असो अथवा चारचाकी असो आपल्या वाहणाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे सरकारने व वाहतूक प्रशासनाने दुर्घनांच्या ठिकाणी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.रोडचे अपघात रोखण्यासाठी सरकार, प्रशासना व नागरिक यांच्यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे वाहतुकीच्या बाबतीत सरकारने किंवा वाहतूक प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे तीतकेच गरजेचे आहे.कारण "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.परंतु राज्यातील अनेक



भागात टिप्पर,ट्रक चालकांच्या व इतर वाहनचालक यांच्या निष्काळजीपणामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यावर वाहतूक प्रशासनाने कठोर पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.सध्या नागपूरला 19 डिसेंबर पासून हिवाळी अधिवेशनाला सुरूवात होणार आहे.यासाठी करोडो रुपयांचा अवाजवी खर्च करून डेटिंग -पेंटिंग सुरू आहे.परंतु वाढते रोडचे अपघात याकडे सरकार, राजकीय पुढारी व प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. राज्यातील अनेक महामार्ग मृत्यूचे महामार्ग बनल्याचे दिसून येते.याचे जिवंत उदाहरण म्हणजे नागपूरातील चिचभुवन येथून जाणारा राष्ट्रीय महामार्ग हा आता मृत्यूचा महामार्ग झाल्याचे दिसून येते.कारण या महामार्गावरील अतिभरधाव वाहने दिसली की येथील रहिवास्यांना थरकाप सुटतो. चिंचभुवन चौकात आतापर्यंत अनेक अपघात झाले असून त्यातील मृतांची संख्या मोठी आहे.येथील रहीवाशांना नागपूरकडे येण्यासाठी जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागतो.हीच परिस्थितीत अनेक महामार्गावर आपल्याला पहायला मिळते. अपघातांचे उदाहरण द्यायचे झाले तर सरकारी आकड्यानुसार भंडारा जिल्ह्यात जानेवारी 2022 ते नोव्हेंबर 2022 या कालावधीत एकुण 426 अपघात झालेत या अपघातात 154 लोकांचा मृत्यू झाला व 216 गंभीर जखमी झालेत आणि इतर किरकोळ जखमी झाले असे अहवालात म्हटले आहे.अशी अपघातांची भयावह परिस्थितीत एकट्या भंडारा जिल्ह्याची आहे तर महाराष्ट्रातील 36 जिल्ह्याची काय गंभीर परिस्थिती असेल हे आपण समजू शकतो.म्हणजेच अपघातांची वाढती संख्या अत्यंत चिंताजनक व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वाढते अपघात रोखण्यासाठी नागरिकांनी सामोरं येण्याची गरज आहे.याकरिता आपण सर्वांनी सर्वप्रथम वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. वाहन चालवितांना मुख्यत्वे करून मोबाईलचा वापर करूच नये.त्याचप्रमाणे आपल्या वाहनांचे हॉर्न, ब्रेक,इंडीगेटर सदैव व्यवस्थीत(ओके) असायला हवे व यांचा योग्यवेळे वापर व्हायलाच हवा जेनेकरून अपघात रोखण्यास मोठी मदत होईल आणि वाहन चालवितांना नेहमीच सतर्कता बाळगली पाहिजे.सरकाने अधिवेशन आहे म्हणून स्वतःच्या सुविधेसाठी रोडचे खड्डे न बुजवीता नागरिकांना होणारा त्रास पाहून व वाढते अपघात पाहून रोडचे खड्डे बुजवले पाहिजे व वाढते अपघात टाळण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. लेखक.

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

## साबुदाणा खिचडी

साबुदाणे पाण्यात भिजवावे...उरलेले पाणी काढून टाकावे. ४-५ तास भिजत ठेवावेत.
२) कढईत २ चमचे तूप गरम करावे. त्यात जीरे आणि बारीक चिरलेल्या मिरच्या घालून फोडणी करावी. त्यात बटाट्याच्या काचऱ्या घालून परताव्यात. वाफ काढावी.
३) बटाटा निट शिजला गेला कि त्यात साबुदाणे घालावेत. वाफ काढावी.साबुदाणा शिजला कि शेंगदाण्याचा कूट घालावा. मिक्स करून नारळ, लिंबाचा रस, चवीनुसार साखर मिठ व कोथिंबीर घालावी आणि दह्याबरोबर खावे. खिचडीबरोबर लिंबाचे गोड लोणचेही खुप छान लागते. **साहित्य:**

दिड कप साबुदाणा १/२ कप बटाट्याच्या काचऱ्या १/२ कप शेंगदाण्याचा कूट ४-५ हिरव्या मिरच्या २ टेस्पून साजूक तूप १/२ टिस्पून जिरे चवीपुरते साखर, मीठ कोथिंबीर १ लिंबू.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावणारी सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी कृषी व अन्न प्रक्रिया हा उत्तम पर्याय आहे.शिवाय पोषण मूल्य असणाऱ्या.प्रक्रिया उत्पदनांची मागणी वाढत आहे. या पार्श्वूभूमीवर मोदी सरकारने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक.सुबत्ताअणण्याला प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे त्यांना त्यांचे पीक कमी नफ्यावर विकावे लागते. शेतकऱ्यांना या मजबुरीतून बाहेर काढून स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. कोरोना महामारीच्या काळापासून, भारत सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न उद्योग अपग्रेडेशन योजना' सुरू केली आहे, ज्यामध्ये शेतकरी आणि तरुणांना अन्न प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी आर्थिक अनुदान दिले जात आहे. या योजनेचा मुख्य उद्देश उद्योजकतेसाठी रोजगाराच्या शोधात खेड्यांतून शहरांकडे स्थलांतरित होणाऱ्या शेतकरी आणि तरुणांना प्रोत्साहन देणे हा आहे. यामुळे गावकऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी खुल्या होणार असून त्यांना शेतीसोबतच उत्पन्नाचा आणखी एक स्रोत मिळणार आहे.**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न उद्योग अपग्रेडेशन योजनेंतर्गत केंद्र सरकार आणि राज्य सरकारांकडून संयुक्तपणे आर्थिक प्रोत्साहन देत असते. यामध्ये ६०% मदत केंद्र सरकार आणि उर्वरित ४०% राज्य सरकारे उचलणार आहे. केंद्र सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना सन २०२४-२५ पर्यंत राबविण्यात आली असून, त्यामध्ये अन्न प्रक्रिया युनिट उभारण्यासाठी ३५% अनुदानाची तरतूद आहे. या योजेअंतर्गत कृषी क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी १०लाख रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. १०लाखांच्या अनुदानासाठी अर्ज करा. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. यासाठी सरकार शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजना आणत आहे. यापैकी एक योजना म्हणजे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न उद्योग अपग्रेडेशन योजना. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित उद्योग सुरू करण्यासाठी अनुदानाचा लाभ दिला जातो. या योजनेद्वारे शेतकऱ्यांसह बेरोजगार तरुणांना स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी सरकारकडून १० लाख रुपयांपर्यंतचे अनुदान मिळू शकते. अशाप्रकारे, सरकारी मदतीच्या मदतीने, स्वतःचा उद्योग उघडू शकता आणि त्यातून भरपूर कमाई करता येवू शकते या योजनेची मुख्य अट अशी आहे की तुम्ही जो उद्योग सुरू करत आहात किंवा तुम्ही जो उद्योग सुरू करत आहात, तो शेतीशी संबंधित असावा. योजनेची पात्रता देशातील प्रत्येक नागरिक, शेतकरी आणि युवक प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न उद्योग अपग्रेडेशन योजनेत सामील होऊ शकतात, परंतु केंद्र सरकारने लाभार्थ्यांसाठी काही निकष निश्चित केले आहेत. योजनेसाठी अर्ज करणाऱ्या शेतकरी आणि तरुणांकडे भारताचे कायमस्वरूपी नागरिकत्व असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे. अन्न प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी कुटुंबातील केवळ एका सदस्याला आर्थिक मदत दिली जाईल. केंद्र सरकारने स्वावलंबी भारत अभियानाअंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म उद्योग अपग्रेडेशन योजना सुरू केली आहे. ही योजना २०मे २०२०पासून सुरू करण्यात आली आहे. ही योजना २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून सुरू झाली आहे, जी २०२४-२५ या आर्थिक वर्षापर्यंत चालवली जाईल. अशा प्रकारे ही योजना ५ वर्षे सुरू राहणार आहे. या पाच वर्षांत या योजनेवर १० हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात वाटा उचलतील. हे ९०:१०च्या प्रमाणात ईशान्य आणि हिमालयीन राज्यांसह सामायिक केले जाईल. या योजनेअंतर्गत, १० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांसाठी पात्र उद्योजकांना ३५टक्के दराने क्रेडिट लिंक्ड सबसिडी दिली जाईल. कोणते उद्योग सुरू करण्यासाठी सबसिडी मिळेल. पंतप्रधान सूक्ष्म अन्न उद्योग अपग्रेडेशन योजनेंतर्गत, "एक जिल्हा एक उत्पादन" आधारित आले आणि इतर अन्न प्रक्रिया युनिट जसे की केळी चिप्स युनिट, आंब्याचे लोणचे, आमचूर, ज्यूस, पेरू जेली, जाम, आवळा फळ उत्पादनांमध्ये कँडी, पावडर, सुपारी, मुरंबा, लिंबू लोणचे, मुरंबा, स्क्वॅश इत्यादींचे पॅकिंग उत्पादन युनिट उघडण्यासाठी अनुदानाचा लाभ दिला जाईल. त्याचप्रमाणे भाजीपाला उत्पादनांमध्ये टोमॅटो केचप, चटणी, सॉस, सुका टोमॅटो, पावडर, मिरचीचे लोणचे, सुक्या मिरची पावडर, कारल्याचा रस, बटाटा चिप्स, कांदा प्रक्रिया युनिट, मसाल्याच्या पदार्थ- धणे पावडर, हळद-आले पावडर, डाळ जेवण, तांदूळ. जेवण. फ्लोअर मील, पल्व्हराइज मील इत्यादी उद्योगांसाठी सबसिडी दिली जाईल. फलोत्पादन विभागाच्या वतीने पापड, नमकीन, विविध प्रकारचे लोणचे, कुरकुरीत, ब्रेड, टोस्ट, बडी, गूळ, तेलाचे जेवण, जनावरे, पोल्ट्री फीड, चीज उद्योग आणि शेतीशी संबंधित सर्व उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठी युनिट्सची स्थापना अनुदानासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.एकंदरीत, शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी सरकार वेगवेगळ्या प्रकारच्या योजना आखत असुंन या योजनांचा फायदा काही शेतकरी घेत आहे. शेतकऱ्यांनी ही योजना समजून घेण्याची गरज आहे.मात्र बहुतांश शेतकऱ्यांना सरकार द्वारा चलविल्या जाणाऱ्या योजनाच माहीत नाही.. मोठ्या शेतकऱ्यांना योजनांचा फायदा होत असला तरी लहान व अल्पभूधारक योजनांपासून वंचित असतात.या योजनांची अंमलबजावणी देखील होत नसल्याने जसा लाभ मिळायला पाहिजे तसा मिळत नाही.सरकारी दप्तर दिरंगाई व बँकांच्या कचाट्यात या योजना या न त्या कारणांनी अडकल्याने शेतकऱ्यांना योजनांचा लाभ लवकर होत नसल्याने बहुतांश शेतकरी योजनांचा लाभ घेवू शकत नसतात.

# भारतीय नौदल दिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती.**

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मानवी मनोव्यापाराचे चित्रण : 'केमिस्ट्री'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**'कथा' हा कथनात्मक साहित्यप्रकार आहे. लहानपणापासून आपण विविध कथा ऐकल्या असतील. राजा - राणीची गोष्ट, परीची गोष्ट, राक्षसाची गोष्ट, जादुगार वा चेटकीणीची गोष्ट , भूतांच्या गोष्टी इत्यादी. मुळात ज्यात रहस्य आहे, गूढ आहे, अशा कथा सगळ्यांना आकृष्ट करतात.लेखक रत्नाकर मतकरी यांनी मराठीत गूढकथा हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय केला. कबंध, खेकडा, गहिरे पाणी, निजधाम, निर्मनुष्य हे मतकरी यांचे गूढकथा संग्रह प्रसिद्ध आहेत. नारायण धारप यांनीही उत्कृष्ट गूढकथा लिहिल्या. त्यांनी निर्मिलेले 'समर्थ' हे काल्पनिक पात्र आणि त्यावर आधारित गूढकथा अतिशय गाजल्या. अनोळखी दिशा, अघटित, चेटकीण, भयकथा, मृत्युद्वार ,मृत्युजाल हे नारायण धारप यांचे गूढकथा संग्रह प्रसिद्ध आहेत. मनात उत्कंठा निर्माण करणारे साहित्य वाचणारा वेगळा वाचकवर्ग आहे.**

मानवी मन हा विचारांचा सागर आहे. एकाच वेळी मनात विविध विचार सुरु असतात. आपल्या अवतीभवती विभिन्न स्वभावाच्या व्यक्ती वावरत असतात. प्रत्येकाचे आयुष्य वेगळे, विचार वेगळे आणि त्यांच्या समस्याही वेगळ्या. तरीही कितीही संवाद साधला तरी मानवी मनाचा ठाव लागणं सोपे नाही. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यामागील भूमिका मनात गूढ निर्माण करते.

लेखक रामदास खरे यांचा 'केमिस्ट्री' हा पहिलाच गूढकथा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला. बऱ्याच कालावधीनंतर अनुभवसंपन्न, सक्षम गूढकथा वाचल्याचे समाधान लाभले. 'केमिस्ट्री' हा गूढकथा संग्रह मानवी मनाचा तळ गाठणारा आहे. मानवी मनातील अस्वस्थता, अनाकलनीयता , वैचित्र्य अधोरेखित करणाऱ्या ह्या कथा आहेत. लेखक खरे हे कवी, चित्रकार, निसर्गप्रेमी,संगीतप्रेमी असे व्यक्तिमत्त्व आहे. चित्रकार म्हणून असणारी त्यांची दृष्टी, संवेदनशीलतेच्या रंगछटा कथासंग्रहात शब्दरूपी रंगांनी उमटलेल्या आहेत. कथासंग्रहात एकूण १२ कथा समाविष्ट असून प्रत्येक कथेचे स्वतःचे असे मर्मस्थान आहे. काही कथा तृतीयपुरुषी निवेदनातून उलगडत जातात तर काही कथा ह्या आत्मनिवेदनातून संवाद साधतात. अर्थपूर्ण वाक्यरचना, उत्तम वातावरणनिर्मिती, कथेतील एकंदरीत मोकळेपणा वाचताना वाचकाला अंतर्मुख करतात. वर्तमान आणि भूतकाळ यांची उत्तम बांधणी या कथासंग्रहात अनुभवायला मिळते. लेखक खरे यांचं गाव तळकोकणातलं , त्यामुळे आजुबाजुचा निसर्ग, समुद्र, झाडी, नदी , परिसरातील विविध स्वर, नाद त्यांच्या मनात कुठेतरी विसावला. त्यांना पूर्वीपासूनच गूढतेचं आकर्षण असल्याचे त्यांनी मनोगतात व्यक्त केले आहे. नाही म्हटलं तरी आपलं व्यक्तिमत्त्व घडत असताना अशा अनेक गोष्टी आपल्या आसपास घडत असतात , ज्याचा आपल्या मनावर खोलवर परिणाम होत असतो. अमुक अमुक प्रसंग, घटना मनावर कायमच्या कोरल्या जातात. ज्या कधीच विस्मरणात जात नाही. लेखकाने हे वैचित्र्य, गूढ आपल्या सूक्ष्म निरीक्षणातून टिपले आहेत आणि तेच लेखणीतून अवतरले आहे. लेखक खरे यांची लेखनशैली, निवेदनशैली कथेचे गूढ शेवटपर्यंत राखण्यात यशस्वी झाली आहे.




'केमिस्ट्री' कथासंग्रहातील पहिलीच कथा. फिजिक्स, केमिस्ट्री शिकवणारे शिक्षक श्री. दीक्षित आणि मिस्टर कोटस्थाने यांच्याबाबत घडणाऱ्या घटना उलट क्रमाने घडतात. एखादी घटना घडली की त्यातील व्यक्तिऐवजी स्वतःला त्यात पाहणं किंवा त्या घटनांचा भूतकाळाशी संदर्भ जोडणाऱ्या मनाची अस्वस्थता विशद करणारी ही कथा आहे. 'बर्ड फीडर' या कथेचा फॉर्म थोडा वेगळा आहे. तो आणि ती म्हणजे चिमणा आणि चिमणी यांच्या संवादातून आणि तृतीयपुरुषी निवेदनातून ही कथा उलगडत जाते. चिमण्यांच्या संवादातून सोसायटीतील विविध व्यक्तिचे स्वभावविशेष कळत जातात. शांत स्वभावाचे आनंदराव आणि आकांडतांडव करणारी त्यांची पत्नी मैथिली यांच्यातील मतभिन्नता आणि आततायीपणा नजरेतील आत्मविश्वास कसा उद्ध्वस्त करतात, याची विलक्षण कथा आहे. स्वप्नांचा मागोवा घेणारी आणि मनात साचलेलं दुःख, राग , संताप आपल्या विचित्र कृतीतून व्यक्त करणारी अनामिका आणि भूतकाळातील घटनांचा वर्तमानाशी संदर्भ जोडण्याचा प्रयत्न करणारा निवेदक यांच्यातील साधर्म्य 'तळ्याकाठी' कथेत व्यक्त होते. 'झुला' कथेतील ४ वर्षापूर्वी कॅन्सरमुळे निधन पावलेली सलीलची पत्नी मोहिनी , तिच्या विरहाने व्याकुळ झालेला सलील परवीन नावाच्या वेश्येच्या सहवासासाठी तड़फड़त असतो. अचानक असे काय होते, की तो हादरतो. नियतीने पुन्हा तोच खेळ मांडलेला तर नाही ना ? नियतीने निर्माण केलेल्या झुल्यात सलील झुलत राहतो का ? हे गूढ मनात रुंजी घालत राहते. अपघातात मृत्यू पावलेल्या संकेतच्या आठवणीं जपणारी, त्याचे अस्तित्व मानणारी आजी , आजीच्या मानसिक वेदना, तिचं वागणं , संकेतच्या अस्तित्वात स्वतःला विलीन करणारी माईची कहाणी म्हणजे 'अल्बम' ही कथा होय. 'सिग्नल' ही कथा सिग्नलवर बसलेल्या त्या २ जणांपासून सुरु होते आणि शोध सुरु होतो साध्या - सरळ मकरंदचा..अचानक तो कुठे जातो? , त्याची कारणे काय ? याचा शोध घेणारी ही कथा आहे. 'विहीर' कथेत आपल्या पत्नीच्या अचानक पुण्याला जाण्याने आणि टॉमीच्या मृत्युने एकाकी पडलेल्या नानांच्या विहिरीकडे वाढलेल्या फेऱ्या कोणते संकेत देत आहे, ही अनाकलनीयता मनाला विषण्ण करते. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यामागील कारण , विचारक्षमता, जुन्या आठवणी यात गुंतत जाणं, भूतकाळातील संदर्भांना वर्तमानातील आचाराशी जोडणं , ह्या गोष्टी माणसाला गूढतेच्या गर्तेत कशा ओढत नेतात, याची वास्तवता 'केमिस्ट्री' कथासंग्रहातून चित्रित केली आहे.

लेखक खरे आपल्या लेखणीतून कथेतील परिसर वाचकांसमोर जीवंत करतात. कथेची ठेवण इतकी रंजक आहे की वाचक वर्तमान- भूतकाळ - वर्तमान असा प्रवास करत राहतो. घटनांचा रंजक क्रम, अनामिक ओढ निर्माण करणारे कथानक, भूतकाळ - वर्तमानातील सुयोग्य संदर्भ आणि अनपेक्षित शेवट यामुळे सगळ्या कथा , त्यातील पात्रे, त्यांच्या जगण्यातील वैचित्र्य, गूढता मनाचा ठाव घेते. हा कथासंग्रह वाचताना मला ज्येष्ठ लेखक भारत सासणे यांच्या ' राहीच्या स्वप्नांचा उलगडा' या कादंबरीचे स्मरण झाले. सोबतच ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी आणि श्रीनिवास जोशी यांच्या 'डोह' पुस्तकाची आठवण झाली. डिंपल पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या गूढकथा संग्रहाचे मुखपृष्ठ स्फूर्ती पाटील यांनी समर्पकपणे साकारले आहे. कथेतील गूढता मुखपृष्ठापासून सुरु झालेली आहे. या गूढकथा संग्रहाची यथासांग पाठराखण कथा-कादंबरीकार, अनुवादक , साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रणव सखदेव यांनी केली आहे.एकूणच मानवी मनाचे विविध रंग या कथासंग्रहात अनुभवायला मिळतील. ही 'केमिस्ट्री' नक्की अनुभवा !

**( केमिस्ट्री- गूढकथा संग्रह / लेखक रामदास खरे / प्रकाशक : डिंपल पब्लिकेशन / मूल्य : १६० रुपये )**

# एकत्र कुटुंब पद्धती : संस्कारमय पाठशाळा



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**भारत देश हा खेड्याखेड्यात विखुरलेला आहे. खेड्यातील सर्वधिक लोक शेती हा व्यवसाय करीत होते व आहेत.शेतात अन्नधान्यासहित कडधान्याचे देखील उत्पादन घेतल्या जात होते.संपूर्ण खेडे एक समजून परस्पर सुसंवादाने मदतीचा हात पुढे सरसावला जात असे.पारंपरिक पद्धतीने शेती करीत असल्याने सहकार्याची भावना एकमेकांच्या मनात होती.एकाच कुटुंबात मागील कित्येक पिढ्यापासून एकत्र कुटुंब पद्धती नांदत होती.**

कोणताही भेद, हेवेदावे न करता गुण्यागोविंदाने नांदत होते. भावकी हिस्सा वा स्वार्थभावना त्या जुन्या काळातील लोकांमध्ये कमी प्रमाणात जाणवत होती. जुन्या जाणत्या वयस्कर व्यक्तींचा आदर केला जात होता. कुटुंब प्रमुख या नात्याने सर्वांच्या अडचणी, समस्या समजून घेऊन सोडवित असायचे. आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू व त्यांची मुले एकाच घरात, कमी जागेत समाधानाने, आनंदाने, सुखाने राहत होती. एक संयुक्त कुटुंब,एक चूल' या पद्धतीने परस्परपूरक भूमिका घेऊन गोडीगुलाबीने राहणारी कुटुंब पद्धती आज खूप कमी प्रमाणात दिसून येत आहे. खरे तर,पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेली एकत्र कुटुंब पद्धती ही एक संस्कारमय पाठशाळाच होती असं म्हटल्यास चुकीचे होणार नाही. खेड्यामध्ये अजूनही वृद्ध व्यक्तींचा आदर, सन्मान केला जातो. त्यांची काळजी घेतल्या जाते. वयस्कर आजी-आजोबा यांचे आपल्या नातवावर पुर्णपणे लक्ष ठेऊनच असायचे.शेतीत राबून म्हातारपणाची चाहुल लागताच शेतीची धुरा मुलांकडे स्वेच्छेने सोपवून नातवावर बोधकथेतून संस्काररूपी पेरणी करायचे.आई-वडिलांवर शेतीची कामे सोपविल्यामुळे मुलांकडे पाहिजे त्या प्रमाणात वेळ देता येणे शक्य नसायचे म्हणून नातवांकडे लक्ष देऊन दक्ष राहण्यासाठी आजी-आजोबा तत्पर असायचे.सकाळी उठल्यापासून तर सायंकाळपर्यंत नातवाची काळजी घेण्याची जबाबदारी आजी-आजोबांची असायची. नातवाला देखील आजी-आजोबांचा लळा, जिव्हाळा लागून असायचा. नातेवाईकाकडे जायचे असल्यास नातवाला घेऊन जात होते. आजी-आजोबांच्या सानिध्यात घालविलेले क्षण वा बालपण विसरणे शक्य नाही.आजच्या आधुनिक युगात मात्र आजी-आजोबांची रवानगी वृद्धाश्रमात केल्या जात आहे.हयातभर काबाडकष्ट करून कुटुंबाचा गाडा हाकणाऱ्या कुटुंब प्रमुखाला बाजूला सारणे ही अत्यंत क्लेशदायक बाब आहे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे घरातील बालकांवर छोट्या-छोट्या काल्पनिक वा वास्तविक कथेतून बोध देणारी आजी-आजोबांची शाळा असायची.कुटुंबात आजी-आजोबांना आपल्या नातवांचा लाड पुरवीत वा वेळप्रसंगी कठोर होत विचारांना दिशा देण्याचे कार्य त्यांच्या हातून घडत होते तद्वतच खाण्याची,पिण्याची वा आरोग्याची काळजी घेत असत.एकाच कुटुंबापूरते मर्यादित राहायचे नाही तर शेजारची लहान मुलांना देखील विनामूल्य सांभाळण्याचे सौजन्य दाखवीत होते त्यामुळे सर्वसमावेशक,परस्परपूरक,सह कार्यवृत्ती जोपासणारी पिढी आज दुरापास्त होत असल्याचे विचित्र चित्र दिसते आहे. आज परिस्थिती या उलट दिसून येते आहे.एकत्र कुटुंब पद्धतीची जागा विभक्त कुटुंब पद्धतीने घेतली आहे.प्रत्येकाला मोकळीक मिळण्याच्या हिशोबाने "हम दो...हमारे दो" अशी मनोभूमिकेने विभक्त होत आहेत त्यामुळे लहान मुलांचा मनोविकास होतांना दिसत नाही. धकाधकीच्या,संघर्षाच्या काळात मुलांना वेळ देणे शक्य नाही म्हणून मुले एकाकी पडत आहेत. त्यांच्या वागण्यात चिडचिडेपणा येत आहे.मुलांची निरीक्षणक्षमता ही अफाट आहे.तंत्रज्ञान खूप वेगाने पुढे सरकत आहे तेवढ्याच गतीने मुले देखील जात आहेत.मोबाईल वरील कार्टून,गेम यामध्ये व्यस्त होऊन स्वतःची शारीरिक व मानसिक वाढ खुंटत जात आहे याकडे पालक या नात्याने लक्ष देण्यास टाळाटाळ होत आहे.फेसबुक,वॉट्सअप्प या सोशल साईट्समुळे मुले मानसिकदृष्ट्या कमकुवत होत आहे.मैदानी खेळाचा विसर पडल्याने व आजी-आजोबापासून दूर असल्याने बालकांच्या भावविश्वाशी जुळवून घ्यायला आई-वडील समोर येत नाही.वृद्ध मंडळी व बालपण यांचे सौहार्दाचे संबंध पूर्वी जुळून येत होते पण सध्या समाजात डोकावून बघितल्यास ८० टक्के कुटुंब ही विभक्त



पद्धतीने तर फक्त २० टक्के कुटुंब हे एकत्र कुटुंब पद्धतीत आचरण करीत असल्याचे दिसून येते त्यामुळे आजी-आजोबांमुळे मुलांवर होणारी संसाराची पेरणी म्हणजे एक प्रकारची पाठशाळाच होती. ती आता दिसेनाशी होत आहे. आजी-आजोबांकडे जड कामे कोणतीही नसल्याने कुटूंबात असणाऱ्या लहान बालकांना खेळविणे हाच त्यांचा नित्याचा क्रम.. वयाच्या सहा वर्षापर्यंत चालायला, बोलायला शिकविण्याचे उत्तम कार्य पालक या नात्याने करीत असायचे. सकाळी उठल्यानंतर ब्रश, नास्ता, अंघोळी पासून तर दुपारचे जेवण देण्याची सोय तसेच जीवन मूल्याची देण म्हणजे उत्कृष्ठ अशी पाठशाळाच म्हणायला हवी.समजा,जेवण करतांना केलेला हट्ट,समजविण्यासाठी केलेला लडीवाळपणा ह्या गोष्टी आजी-आजोबा करीत असे पण आता त्या बाबी दिसत नाही.सायंकाळी झोपतांना मूर्त-अमूर्त कल्पनेतून सांगणाऱ्या कथा मुलांना हव्या-हव्याशा वाटत असे.निर्जीव वस्तू लहान बालकांना देऊन त्यांचे मानसिक सबलीकरण,ताकद,संस्कार वाढविल्या जात होते व लहान मुलांचे/नातवांचे पालनपोषण करण्यात कोणतीही कसूर आजीआजोबा ठेवत नसे.लहान मुलांच्या जाणिवा,भावभावना,अभिव्यक्तीशी जुळवून घेण्याची क्षमता आजी-आजोबांकडे ठासून भरलेली होती कारण कधी काळी ते देखील लहान असतांना त्यांच्याही आजोबांनी केलेल्या संस्काराची परतफेड या नात्याने परंपरा जपल्या जात होती कारण बालक हा अनुकरणप्रिय असतो सध्याची आकर्षण केंद्रे बदललेली आहेत आणि संयुक्त कुटुंब पद्धती पासून दूर जाऊन आपल्याच मुलांची व आपली सीमा मर्यादित करीत असल्याचे दिसून येत आहे.संयुक्त कुटुंब पद्धतीची चालती-बोलती पाठशाळा काळाच्या पडद्याआड जात असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

# पी.टी. उषा यांची सार्थ निवड !

आधुनिक केसरी

**भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदी भारताची सुवर्ण कन्या पी.टी उषा पुर्ण नाव (पिलावुलाकंदी तेकेपरंबिल उषा) यांची निवड झाली आहे. ती सार्थच आहे.केरळ राज्यातील कोळीकोड जिल्ह्यातील पाय्योली येथे जन्मलेल्या पी .टी .उषा या भारताच्या सुवर्कन्या म्हणून त्यांची ओळख आहे. ९५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच महीला भगिनीला हा मान मिळाला आहे.याचा विशेष आनंद होत आहे.तमाम भारतियांसाठी खरोखर अभिमानाची बाब आहे.**



भारताची धावपटू म्हणून त्यांनी विशेष नाव कमविले. १९७८मध्ये कोलोम येथे पार पडलेल्या आंतरराज्य स्पर्धेत त्यांनी पाच पदके जिंकली,यात उंच उडी ,१००,२००,आणि ६००मीटर अडथळ्यांची शर्यतीमध्ये सुवर्ण,लांब उडी मध्ये रौप्य,तसेच रिले स्पर्धेत रौप्य ब्राँझ पदक पटकावले आहे. मॉस्को येथे १९८०मध्ये ऑलिम्पिक स्पर्धेत वयाच्या १६ व्या वर्षी १००मिटर स्पर्धेत पाचव्या स्थानावर येत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

ऑलिम्पिक स्पर्धेत अंतिम फेरीत धडक मारणारी भारतातील पहीली महीला व कमी वयाची खेळाडू म्हणून पि. टी उषा यांची ओळख आहे.१९८१मध्ये वरीष्ठ गटात १००,तसेच २००मिटर स्पर्धेत राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली १९८२ मध्ये दिल्ली येथे पार पडलेल्या आशियाई स्पर्धेत रौप्य पदक पटकावले.लॉस एंजिलिस मध्ये ४०० मिटर अडथळ्यांची शर्यततीत अंतिम फेरीत पी. टी. उषा सहभागी झाल्या. यात त्यांना चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. एवढा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. उषा अकादमीच्या माध्यमातून त्या खेळाडु घडवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत.भारतीय राज्यसभेच्या त्या खासदार आहेत .अतिशय महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने भारतियांसाठी ही अभिमानाची बाब आहे. पी.टी. उषा यांना अर्जुन, पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.याशिवाय ग्रेटेस्ट वुमन ॲथलेट, बेस्ट ॲथलेट, इन आशिया ॲवार्डने देखिल सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या निवडीने ऑलिम्पिक संघटनेला निश्चित लाभ होणार आहे.त्यांचा ऑलिम्पिक मधील प्रवास थक्क करणारा आहे. प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. तो नक्कीच भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या कामी येईल यात शंका नाही. भारतीय ऑलिम्पिक संघटनेला ते वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतील. एक महीला म्हणून त्यांची निवड झाल्याचा सार्थ अभिमान आहे.त्यांना क्रिडा रसिकांच्या वतीने पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.


# घनदाट केसांसाठी रामदेव बाबांनी सांगितले खास उपाय

वातावरणातील बदलामुळे केस गळणं, केस पांढरे होणं सध्या खूपच सामन्य झालं आहे. यासाठी अनेक उपाय केले जातात. महागडे शॅम्पू, पार्लरच्या ट्रिटमेंट्स अशा गोष्टींचा समावेश केला जातो. केसगळतीमुळे त्रासलेल्या अशा लोकांसाठी बाबा रामदेव यांनी सांगितलेले काही उपाय रामबाण उपाय ठरू शकतात. या उपायाची जमेची बाजू ही आहे की हे उपाय तुम्ही घरच्या घरी करु शकता. एका मुलाखतीमध्ये बाबा रामदेव यांनी हे उपाय सांगितले आहेत. चला तर मग जाणून घेऊयात काय आहेत ते उपाय. बाबा रामदेवांच्या मते महागडे शॅम्पू आणि कंडिशनर्स विकत घेऊ नका.

यामधील केमिकलमुळे तुमच्या केसांचे नुकसान होऊ शकते. पण जर तुम्हाला शॅम्पू वापरायचा असेल तर त्याआधी तुम्ही केसांना मोहरीचे तेल, खोबरेल तेल किंवा दही लावा त्यामुळे केस आजपर्यंत मजबूत राहतात. सगळ्यात आधी ५ मिनिट बोटांची नखं एकमेकांना घासा. जर तुम्ही उच्च रक्तदाबाचा त्रास नसेल तर २ ते ५ मिनिटं शीर्षासन किंवा सर्वांगासन करू शकता. हे केसांसाठी खूप फायदेशीर ठरते. पण गरोदर महिलांनी आणि



उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या व्यक्तीने हा उपाय करु नये. केसांसाठी त्याच प्रमाणे वजन कमी करण्यासाठी दुधीचा रस पिण्याचा सल्ला दिला जातो. म्हणूनच दुधीचा रस आणि आवळ्याचा रस नियमित प्यायल्याने आठवडाभरात केसगळती थांबते. रामदेव बाबांनी केस धुण्याच्या एक दिवस रात्री केसांना तेल लावण्याचाही सल्ला दिला आहे. यामुळे केसांची वाढ होण्यास मदत होईल. रामदेव बाबांनी सांगितले की केस धुण्यासाठी दही किंवा आंबट ताक वापरता येते. की त्यांचा वापर केल्याने कोंडा किंवा खाज येण्याची समस्या दूर होते. ताकामध्ये मुलतानी माती, थोडे खोबरेल तेल आणि लिंबाचा रस मिसळा. त्यामुळे डोके स्वच्छ होण्यासोबतच केस रेशमी बनतील. पौष्टिक आहार, हिरव्या भाज्या, फळे खाण्यास सांगितले. त्याच वेळी, त्यांनी अधिक तळलेले आणि मसालेदार पदार्थांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. बाबांनी असेही सांगितले की ज्यांना जास्त राग येतो किंवा चिंतेत राहतात त्यांचेही केसही जास्त पिकतात. त्यामुळे तुम्ही योगा देखील करु शकता.



# "तू गंगा की मौज में..."

आधुनिक केसरी

**पहाटे पहाटेच अख्ख्या गल्लीला जाग आणणारा आमच्या घरातला तो मोठ्ठा मरफ़ी रेडिओ, आणि त्या रेडिओवर लागलेल्या गाण्यांसोबत घराच्या वरच्या मजल्यावरच्या बंगईवर झोके घेत घेत रफींच्या आवाजात आपला सूर मिसळणारा मी! हो, मीच! खूप, म्हणजे खूपच आवड होती मला रेडिओवर गाणं ऐकायची, त्यासोबत गायची. आवडीचं कोणतंच गाणं मला कधी पाठ करावं लागलं नाही.'**

तू कहाँ ये बता...' म्हणणारा मी कधी देव व्हायचो तर 'दिल कहें रुक जा रे रुक जा...' गाणारा धर्मेन्द्र! चित्रपटांची ती दुनिया त्या वेळी लोकांच्या जगण्याचा एक भागच होती. आज... साठीला पोहचलो तेव्हा सगळ्याच गोष्टींची मनात पुन्हा उजळणी सुरु झालीये.

आज; काय ऐकू या? तलत? किशोर? की लताने गायलेलं 'गंगा जमुना'चं 'दग़ाबाज तोरी बतियाँ...' उहू... आज 'बैजू बावरा'तलं, 'तू गंगा मौज मे....'च ऐकू या! नौशादजींच्या संगीत दिग्दर्शनाची जादू या गीतात जास्त प्रखतेने समोर आलीये. बोलता बोलताच मग डोळ्यांसमोर उभा राहिला तो प्रीत रसाने तुडुंब भरलेला अनवट असा नजारा! 'अकेली मत जई यो...' नदी किनारी उभा असलेला बैजू; होडी वल्हवत दूर दूर जाणाऱ्या गौरीकडे बघून गातोय, 'हो जी हो...'च्या हारात होडीसारखंच गौरीचं काळीजही हेलकावतंय.

'तू गंगा की मौज़ में जमुना का धारा हो रहेगा मिलन ये हमारा तुम्हारा...' कानांवर पडलेल्या या प्रीत तुषारांनी लाजेच्या मारे गौरी शरमते. बैजूच्या भुमिकेत नायक भारत भूषण या गाण्याच्या वेळी कमालीचा देखणा दिसलाय. आपल्यावरच्या प्रेमाचा बैजूने सगळ्यांसमोर केलेला इजहार पाहून... गौरी कावरी-बावरी झालीये. तिच्या नजरेतले ते विलक्षण भाव आणि तिच्या मनाची ती रुणझुण, बैजूच्या गोड गळ्यात उतरुन इकडे गाव गोळा करतेय. गाण्याच्या ताला-सुरांत गौरीच्या सख्यांसोबत आता बाकी बघणारेही डोलू लागलेयेत. स्त्री सुलभ लज्जेनं गौरीला आणखीनंच मेल्याहून मेल्यासारखं होतं, दोन्ही हाताच्या ओंजळीत ती आपला चेहराच लपवते. गाण्याच्या सुरांनी झंकारलेलं नदीचं पाणी अन बैजूच्या शब्दांची जादू... गौरीच्या होडीला हळुहळु किनाऱ्यावर, दुसऱ्या एक होडीजवळ असलेल्या बैजूपर्यंत घेऊन येते. होडीला होडी धडकते तशी दचकून गौरी डोळे उघडते आणि अचंबित होऊन शहारतेच! 'हो रहेगा मिलन ये हमारा तुम्हारा...' हे शब्दच जणू अर्थापर्यंत पोहचलेले असतात. दिग्दर्शक विजय भट्ट यांनी हे गाणं फारच अप्रतिमरीत्या फिल्मांकित केलंय. रफ़ीने तर बैजूच्या अंतरंगात उतरुनच हे गाणं गायलंय की काय असं वाटतं. आणि या गीताला असीम उंचीवर नेणारं नौशादजींचं संगीत हा तर एक अद्‌भुत चमत्कारच म्हणायला हवा. भारतीय लोकजीवन, परंपरा अन संस्कृतीच्या संगमातून या अनघड गाण्याचं संगीत जन्माला आलंय. या गाण्यासाठी नौशादजींना पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता. सुप्रसिद्ध गायक आमिर खान हे 'बैजू बावरा'चे सल्लागार होते. नौशाद... जिथं संगीत सृजनाच्या सगळ्याच वाटा येऊन थांबतात. हिंदी चित्रपटसृष्टीच्या या महान संगीत दिग्दर्शकाला, भारतीय सिनेजगताचे संगीत सम्राट म्हटलं जातं ते काही उगाच नाही!

नौशाद यांचं संपूर्ण नाव; नौशाद वाहिद अली. २५ डिसेंबर १९१९ला लखनौ येथे त्यांचा जन्म झाला. लखनौ हे शहर तेव्हा भारतीय मुस्लिम संस्कृतीची परंपरा जपणारं सामाजिक केंद्र म्हणून ओळखलं जात होतं. नौशाद यांचे वडील कोर्टात मुन्शी (लिपिक) म्हणून काम करीत होते. लहान असताना नौशाद हे लखनौपासून पंचवीस किलोमीटरवर असलेल्या देवा शरिफ येथे वार्षिक मेळाव्याला जात असत. देवा शरिफ हे वारिस अली शाह यांच्या समाधी साठी प्रसिद्ध आहे. त्यावेळीचे सर्व थोर कव्वाल, संगीतकार तेथे हजेरी लावीत असत. नौशाद यांनी तेथे

## मला भावलेली सिनेरत्न

मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236



उस्ताद घुरबत अली, उस्ताद युसुफ अली, उस्ताद बब्बन साहेब आणि इतरांच्या तालमीत हिंदुस्थानी संगीताचा अभ्यास केला. रूढीवादी असलेल्या त्यांचा आई-वडिलांनी नकार दिल्यावर सुद्धा ते एका संगीत थियेटर ग्रुपमध्ये सामील झाले होते. त्यांची कर्तबगारी बघून काही दिवसातच त्या थिएटरचे संगीतकार म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. मूकपटांचा तो जमाना. त्यावेळी लाहोरमधील रॉयल थिएटरमध्ये लोक मूक सिनेमे पाहायला यायचे. मग, त्या मूक सिनेमांसाठी तबला, हार्मोनियम, सितार आणि व्हायोलिन वाजविण्यासाठी थियेटर मालक तेव्हा एक संपूर्ण टीम भाड्याने ठेवीत असे. सर्वात आधी संगीतकार चित्रपट पाहायचे, नोट्स बनवायचे आणि त्यावरुन हवी ती मीटरपट्टी ठरवून संध्याकाळी ती वाद्यवृंद टीम, पडद्यासमोर बसून चित्रपटातील




दृश्यांसाठी दर्शकांसमोरच संगीत वाजवीत असे. मनोरंजनासोबत संगीत शिकण्याचा तो एक छान राजमार्ग होता. कालांतराने लखनौच्या गोलागंज कॉलनीत इंडियन स्टार थियेटरिकल कंपनी स्थापन करुन, नौशाद यांनी संगीतकार म्हणून स्वतंत्रपणे काम करण्यास सुरवात केली. लद्दानखानच्या तालमीत पंजाब, राजस्थान, गुजरात आणि सौराष्ट्रच्या लोक परंपरेतील दुर्मिळ वाद्य रत्नांचा त्यांनी कसून सराव केला. एकोणीसशे एकतीसमध्ये मूकपटांना आवाज मिळाला, ज्याने बारा वर्षांच्या नौशादना आणखीनंच भुरळ घातली. परंतू इस्लामिक दिक्तांचे काटेकोर पालन करणाऱ्या त्यांच्या वडिलांनी नौशाद यांना घर सोडायचं नसेल तर संगीत सोडण्याचा अल्टिमेटम दिला. मात्र, १९३७च्या समाप्तीला नौशाद घर सोडून मुंबईला पळून आले. मुंबईत सुरुवातीला; आपल्या एका ओळखीच्यांकडे ते थांबले. काही काळाने दादरला ब्रॉडवे सिनेमा थिएटरच्या समोरील फुटपाथवर त्यांनी आपलं बस्तान बसविलं. त्या काळातले यशस्वी उस्ताद झंडेखान यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम केल्यावर, उस्ताद मुश्ताक यांच्या वाद्यवृंदात पियानो वादक म्हणूनही त्यांनी काम केलं. पुढे; संगीतकार खेमचंद यांनी रणजित स्टुडिओच्या 'कांचन'चित्रपटासाठी नौशाद यांना महिना साठ रुपये पगारावर घेतलं. एकोणीसशे चाळीसमध्ये 'प्रेमनगर' या आपल्या पहिल्या स्वतंत्र चित्रपटाची नौशाद यांनी रचना केली. या नंतर आलेल्या ए. आर. कारदार प्रॉडक्शनच्या १९४२ला प्रदर्शित झालेल्या 'नयी दुनिया' चित्रपटाने खऱ्या अर्थाने ते संगीतकार म्हणून नावारुपास आले. मग; एकोणीसशे चौऱ्हेचाळीसला 'रतन' आला. या चित्रपटातील गाण्यांनी नौशाद यांना एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवलं. एका चित्रपटासाठी त्यावेळी ते रुपये २५०००/- एवढं मानधन घेत होते. लेखक सुब्रमण्यम यांनी म्हटल्यानुसार निर्मितीसाठी ७५०००/- रुपये खर्च झालेल्या 'रतन' चित्रपटामधील, 'अंखियाँ मिलाके जिया भरमाके...', 'ओ जानेवाले बालमवा...' ही गाणी त्यावेळी इतकी काही गाजली की, पहिल्याच वर्षी ग्रामोफोनच्या विक्रीतून कंपनीला तीन लाख रुपये रॉयल्टी मिळाली.

आपण चित्रपटांना संगीत देतोय ही बाब; बराच काळ नौशाद यांनी आपल्या कुटुंबियांपासून लपवून ठेवली होती. जेव्हा खुद्द नौशाद यांचं लग्न झालं तेव्हा त्यांच्या वरातीतले बॅंडवाले 'बाबुल' चित्रपटातलं 'छोड़ बाबुल का घर...' हे गाणं वाजवीत होते. तरीही नौशाद आपल्या वडिलांना सांगू शकले नाही. १९४२ ते १९६०च्या कालखंडात नौशाद हे हिंदी चित्रपटसृष्टीतील टॉपचे संगीतकार होते. सात दशकं आपलं योगदान चित्रपटसृष्टीसाठी देणाऱ्या या फनकाराचे आपल्या कारकिर्दीतल्या ६५ चित्रपटांपैकी २६ रौप्य महोत्सवी, (२५ आठवडे) ८ सुवर्ण महोत्सवी (पन्नास आठवडे) आणि ४ डायमंड ज्युबली (६० आठवडे) ठरले होते. नौशाद हे संगीत दिग्दर्शकच नाही तर एक नामांकित, प्रतिभावंत कवी आणि लेखक सुद्धा होते. 'आठवा सूर' हे त्यांचा उर्दू भाषेतील गझलांचा संग्रह प्रसिद्ध आहे. शास्त्रीय संगीत रागांवर आणि लोकगीतांवर आधारित संगीताचा वापर मोठ्या कौशल्याने त्यांनी आपल्या चित्रपटात केला.

चाळीसच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात गाण्याचं रेकॉर्डिंग हे एखाद्या शांत बगिच्यात रात्रीच्या वेळी केलं जायचं. कारण, रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये त्या काळी ध्वनी-प्रूफ रेकॉर्डिंगची व्यवस्थाच नव्हती. भीम पलासी हे अधिक उत्तेजकतेने बाहेर आणण्यासाठी 'उड़न खटोला'तलं 'चले आज तुम जहाँ से...' हे गाणं त्यांनी रफींना सात वेळेस गायला लावलं होतं. 'गंगा जमुना'तल्या 'नैन लड़ गयी है...' या गाण्यातून नौशाद यांनी लोकसंगीताला मुख्य प्रवाहाशी जोडलं. हा चित्रपट भारतातच नाही तर परदेशातही सुपरहिट ठरला होता. दिलीप कुमारच्या 'आन' चित्रपटासाठी प्रथमच १०० तुकड्यांच्या वाद्यवृंदांचा त्यांनी वापर केला होता. भारतातील पाश्च्यात्य संगीताची सांकेतिक प्रणाली विकसित करणारे, आवाज आणि संगीत यांचे स्वतंत्र ट्रक तयार करणारे, तसेच ध्वनी मिक्सिंग करणारेही ते पहिले संगीतकार होते. चित्रपट संगीताशी अकॉर्डियनची ओळख ही सुद्धा नौशाद यांचीच देन आहे. काळ नावाच्या कातळावर आपली पदचिन्ह उमटवून गेलेल्या नौशाद यांनी संगीतबद्ध केलेली काही संस्मरणीय गाणी - 'जवाँ है मोहब्बत...', 'आवाज दे कहाँ है...' अनमोल घड़ी १९४६ / 'तू मेरा चाँद मैं...', 'मुरलीवाले मुरली बजा...' दिल्लगी १९४९ / 'ऐ शम्मा तू बता...' दास्तान १९५० / 'बचपन के दिन...', 'हुये हम...', 'नसीब दर पे तेरे...', 'मेरी कहानी भूलने वाले...' दीदार १९५१ / 'मन तरपत...', 'ओ दुनिया के रखवाले...' बैजू बावरा १९५२ / 'मान मेरा एहसान...' आन १९५२ / 'चले आज तुम जहाँ से...', 'मोहब्बत की राहों में...' उड़न खटोला १९५५ / 'ओ गाड़ीवाले गाडी...', 'होली आयी रे कन्हाई...' मदर इंडिया १९५७ / 'मधुबन में राधिका...', 'दो सितारों का...' कोहिनूर १९६० / 'प्यार किया तो...', 'तेरी मेहफ़िल में...' मुघल-ए-आज़म १९६० / 'ढूँढो ढूँढो रे सजाना...', 'दो हंसो का जोड़ा...' गंगा जमुना १९६१ / 'मेरे मेहबूब तुझे...', 'मेरे मेहबूब में क्या नहीं...' मेरे मेहबूब १९६३. नौशादच्या चित्रपटातील अवीट अशा या संगीत-लड्या १९९५ पर्यंत बरसतच होत्या. साठच्या दशकाच्या समाप्तीलाच भारतीय चित्रपट संगीत बऱ्यापैकी पाश्च्यात्य संगीताकडे झुकलं, आणि सर्व आघाड्यांवर उस्ताद म्हणून मानले गेलेले नौशादही जुने समजले जाऊ लागले. त्यांच्या प्रतिभेचा वापर खास करुन पारंपारिक आणि ऐतिहासिक चित्रपटांसाठी केला गेला. आपल्या कामाचा भाग म्हणून कवी, गीतकार शकील बदायुनी हे गाणं तयार करण्यासाठी, तास न तास नौशाद यांच्या कार्टर रोडच्या आशियाना बंगल्यात बसलेले असायचे. त्याच कार्टर रोडचं नाव मुंबई महापालिकेने पुढे नौशाद यांच्या आठवणी प्रित्यर्थ, 'संगीत सम्राट नौशाद अली मार्ग' असे ठेवून त्यांना सन्मानित केलं. नौशाद यांनी संगीतबद्ध केलेला १९५७चा 'मदर इंडिया' हा पहिला भारतीय चित्रपट होता जो मानाचे बरेचसे पुरस्कार जिंकून ऑस्करच्या नामांकनापर्यंत पोहचला होता. संजय खानच्या; 'द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान' या गाजलेल्या टी. व्ही. मालिकेला संगीत देणारे नौशाद, वयाच्या ८६व्या वर्षी ०५ मे २००६ला हृदय विकाराने हे जग सोडून गेले. या महान अभिव्यक्तीला भारत सरकारच्या पद्मभूषण पुरस्कारासह, दादासाहेब फाळके, फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक असे खूप सारे मान-सन्मानाचे पुरस्कार मिळाले होते.

थोडं थोडं समजायला लागलं त्या वयात मला नेहमी प्रश्न पडायचा की, पन्नास, साठच्या दशकात कशी ती इतकी नादमधुर, सुंदर, अर्थवाही गाणी तयार झाली असतील? मात्र; आज ती गाणी लिहिणाऱ्या, गाणाऱ्या आणि त्यांना संगीतबद्ध करणाऱ्या दिग्गज अशा महान कलाकारांबद्दल मी जेव्हा खोलवर जाणून घेतोय तेव्हा लक्षात येतंय, तन-मन झंकारून टाकणाऱ्या त्या अवीट गाण्यांसाठी कुण्या सलिलदांनी आपली लेखणी, आपलं तारुण्य या देशासाठी वाहून टाकलं होतं, तर कुण्या नौशादने कुमार वयातच आपलं घरदार सोडलं होतं. सृजन... हे सहजासहजी घडत नाही, त्यासाठी निर्मितीचा ध्यास घ्यावा लागतो, आयुष्य स्वाहाः करावं लागतं. भारतीय परंपरेच्या, संस्कृतीच्या धारेमध्ये नौशादजीही, गंगा-जमुनेसारखे मिसळून गेले होते.

**संदर्भः विकिपिडीया, यु-ट्युब, सिनेमाझी.**

**Highlited Line :** १९४२ ते १९६०च्या कालखंडात नौशाद हे हिंदी चित्रपटसृष्टीतील टॉपचे संगीतकार होते. सात दशकं आपलं योगदान चित्रपटसृष्टीसाठी देणाऱ्या या फनकाराचे आपल्या कारकिर्दीतल्या ६५ चित्रपटांपैकी २६ रौप्य महोत्सवी, (२५ आठवडे) ८ सुवर्ण महोत्सवी (पन्नास आठवडे) आणि ४ डायमंड ज्युबली (६० आठवडे) ठरले होते. नौशाद हे संगीत दिग्दर्शकच नाही तर एक नामांकित, प्रतिभावंत कवी आणि लेखक सुद्धा होते.

## प्रेममिठी

ऋतुचक्र बदलता
सृष्टी मोहक नटली
आले थंडीचे दिवस
काया प्रसन्न भासली....१

मज लागली चाहुल
गोड गुलाबी थंडीची
स्पर्श सख्याचा सुखद
मजा चाखू शेकोटीची...२

राना वनात फुलला
गंध चाफ्याचा सुंदर
दारी प्राजक्ताचा सडा
विसावला मनोहर...३

गावोगावी करू सारे
हुरड्याची मेजवानी
मैफलीत जल्लोषाने
खेळ खेळू अनवानी...४

थंड वाऱ्याची झुळुक
झेलू अंगावर छान
ऊबदार प्रेममिठी
वाटे खरी आलीशान ...५

थंडी सुटली बोचरी
घेवू पौष्टिक आहार
आरोग्यकारक करू
खास एकांती विहार...६

लाडू डिंकाचे,मेथीचे
खाऊ सारे आनंदाने
प्रकृतीस जपतांना
जगू स्नेहाने, प्रेमाने...७

- सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे



## तु माझं गीत गा

माझ्या रक्ताच्या थेंबाणी
तुझ्या धडधडणाऱ्या हृ दयावर
माझी न मिटणारी अक्षर उमटली
ती अक्षर तु सावकाश वाच
आणि समजून घे....!
आटत चाललेल्या रक्तातून
विश्वासाची एक एक ओळ कविता
बनून तुझ्या चरणी लीन होत आहे
माझी....!
माझं मस्तक फाटत चाललं...
आणि रक्तही आटत चाललं...
तु एक कर,
मला जवळ घे आणि प्रेमाचे
दोन घास मला आनंदाने भरवं...!
माझ्यातला 'मी' केव्हाचाच तुझ्यात
विलीन केलाय...
तुझ्या पंखाखाली त्याला
मायेची उब दे...!
तुझ्या नाजूक हातात
त्याचा विश्वासाने हात घे...!
त्याला प्रेमाची साथ दे आणि
सरिता बनून सागरात विलीन
हो...!
कुनीही वाली नसलेल्या त्याच्या
अभागी जीवाला,तुझ्या ममतेच्या
स्पर्शाने आपलसं करून घे....!
आठवणींच्या वाऱ्याने फार वेग
घेतला असून,अंधारी रात्र आणि
दिवसाच्या उजेडाची त्यात
सातत्याने भर पडत आहे...!

सागरकुमार झनके,
9822575244

## बळीराजा गेलाय संपावर

बळीराजा गेलाय संपावर
या संपाच्या नादात
वेळ आणली त्यानं पहा
उपासमारीची समाजावर

संप संप करून काय भेटलं
शेवटी शासनानं गाजरच दिलंय
या राजकारणी लोकांच्या नादी
लागून बळीराजानं स्वतःचं हाल
करून घेतलंय

बडा राजकारणी आज
शेतीवर कर्ज घेऊन मजेत
राहतोय
घेणं देण नाही त्यांना
बळीराजाच
त्यांच्या चुकीचे बळीराजा फळ
भोगतोय

त्यांना फक्त आपल्या
स्वतः च्या कर्ज माफीचं पडलंय
बळीराजा पुरता बुडलाय आज
संपाच्या नादात त्यानं हे कुठं
पाहिलंय

बळीराजा अजून पण विचार कर
रे बड्या राजकीय नेत्यांनी
तुला पूर्ण जनते पासून तोडलंय
का स्वतःच पायावर धोंडा
पडतोय रे
राजकीय नेत्यांना दे लाथळून
स्वतःच हो तू जनतेच्या मनातला
राजाहो तू आता खरा खुरा
बळीराजा

- अमोलभाऊ शिंदे पाटील

## आयुष्य

निघून जाते आयुष्य
खिसे आपुले भरताना
वेळ जाते निघून
दिवस रात्र धावताना
हरवून गेले आहे सारे
सुख विकत घेताना
क्षणभर हसणे सुद्धा
महाग झाले लोकांना
विसरलीत नातीगोती
सारे जवळ असताना
धावपळीचे आयुष्य
निमूटपणे जगताना
आयुष्य आहे सुरेख
कुणीच पाहत नाही
नुसती दगदग सुरु
वेळ कुणाजवळच नाही
बसून मित्रांसोबत
आज कुणी बोलत नाही
सुखामागे धावताना
माणूस आज हरवला आहे
हातच सुख सोडून
दुःखामागे लागला आहे
आयुष्य काय आहे
आज कुणाला कळले नाही
जगण्याचे गुपित कोडे
कुणालाच उमजले नाही

- गणेश म. तायडे, खामगांव



## माय



माह्या मायचा पदर
माह्य मायेचं अंबर
तिच्या लुगड्याची झावर
माह्या सासरातील माहेर

माय भक्त इठ्ठलाची
गाते गानी जनाईची
माह्या मायच बोलनं
जशी वानी रखमाईची

माय नांदते सासरी
माह्य सुखात माहेर
माह्या माहेरपनासाठी
तिचं डोयातच माहेर

मले लागता उचकी
माही माय आठोयते
संध्याकायी तुयशीपाशी
माय पनती लावते

येता वा-याची झुयुक
येतो गंध माहेराचा
वारा खेयतो केसात
करे स्पर्श व मायेचा

-माधुरी चौधरी औरंगाबाद
9421860873

## फुटला तो टाहो

ऐकण्या कोण आहे उभा इथे
सावर गं स्वतःच तू कोण नाही तुझा इथे

घात झाला विश्वासाचा मदत नाही तुला इथे
तूच लढ बळ एकवटून शत्रूलाही मार इथे

तूच ती नारी इथली तूच गं शक्ती इथे
तूच ती झाशीची राणी तूच ती ताराऊ इथे

शिवबाची वाट पाहू नको शस्त्र हाती तू घे इथे
अबला नको राहू आता सबलाही तू हो इथे

झाली कुचेष्टा तुझी तरी आत्मरक्षा तू कर इथे
जगतालाही जाब पुसण्या ऋद्रावतार घे इथे

स्वसंरक्षण करण्या आता तयार हो गं तू इथे
करण्या तांडव शिवासह आदी शक्ती तू हो इथे

- © स्वानंद नंदकुमार मराठे

## खोट्या प्रेमासाठी...

खोट्या प्रेमासाठी जीव
नको देऊस मित्रा
आई बापाचा जीव आहे
तुझ्यावर त्यांचा तरी
विचार कर लेकरा

जीवन दिलंय देवानं तुला
जगण्यासाठी एव्हड्या
लवकर जीवनाला नको
होऊस तू भित्रा
तळ हाताच्या फोडा प्रमाण
जपलंय त्यांनी तुला लेकरा

प्रेमाचं काय आज आहे उद्या नाही
पैश्याची जो पर्यंत नांदी आहे
तो पर्यंत तुझ्या सोबत तिची चांदी आहे

खोट्या प्रेमासाठी जीव
नको देऊस मित्रा
बहीण आहे तुला जरा
तिचा तरी विचार कर लेकरा
तू गेलास तर तिला
आधार कोण देईल मित्रा

## अहो ऐका ना !!!



ऐका ना नाही माझे नटण्या थटण्याचे हे वय
पण मी दिवसभर असते परेशान
भाजी काय बनवायची
याचाच दिवसभर विचार करते
कुणी विचारले कशी आहेस ?
तर बघते महागलेल्या भाजीसारखी
शेजारणीने स्वस्त भाजी आणली याचा बी राग
येतो
खराब टोमॅटो निघाले यात कुणाचा
समोर मुले आली तर सगळा राग त्यांच्यावर
काढते
कामवालीने सुट्टी घेतली हा पण मोठा मुद्दा होतो
भांडी मलाच धुवावी लागतील यामुळे पण
नाराज होते
सांध्याकाळ होताच पारा आणखी वर चढतो
पदतराज घरी आल्यावर जेव्हा हासून बोलतो,
तेव्हा उतरते माझा मुढ खराब आहे
पहाटे कुस बिलणे, मुसमसणेसुरू होते
माझे इथे कोणी नाही, माझां नशीबच फुटकां
आहे
पदत बिचारा हिमतीने जरा सावरू पाहतो
उरला सुरला सगळा राग त्याच्यावर निघतो
तुम्ही तर सकाळी लवकर निघुन जाता
पण माझ्यावर काय बला येते ?
हे माझ्या जीवालाच माहिती
भाजी काय बनवायची
या विचारात सगळा दिवस निघून जातो

-वा.र.आहेर. नासिक-9958785982

## बर्यापेक्षा खरं...

ग्रामपंचात निवडणुकीत
पडेल आता आश्वासनांचा
पाऊस ,
परगावी असणार्या
मतदारांना पण असते
आता मतदानाची हौस !
येण्या-जाण्यासाठी आणि
खर्चासाठी मिळणार पैसे ,
म्हणून येतील मतदानाला
हौसे आणि गौसे ! गावाचा
विकास होईल काय अन्
नाही काय !
त्याने कोणालाच फरक
पडेल काय ? बिगर
पैश्याचे मतदान करणारे
असतील थोडे !
नंतर विकास कामाचे
थोडेच असणार आहे कोडे
? मतदार राजा नको होऊ
तु आता लाचार ,
गावच्या विकासाचा
तु कर आता विचार !
निवडणुकीच्या काळात
गरीबच होतील टार्गेट
! निवडून आल्यावर
पोटाशिवाय दुसरे कोण
असणार टार्गेट ?

- दिनकर जाधव
मो. 7083 272777



## आयुष्य जगताना

आयुष्य जगताना दुसऱ्याचा पण विचार करणारी..
मित्र आणि नातेवाईकांत रमणारी..
सण वार एकत्र साजरी करणारी..
सुखात दुःखात वाटेकरी होणारी..
कितीही होवो त्रास.. न थकता काम करणारी..
देशात काय चाललय.. यापेक्षा शेजारी
सांभाळणारी.. नाटक सिनेमा मध्ये रमणारी..
ती तुमच्या आमच्या सारखी साधी माणसं
असतात.. राब राब राबणारी..
पण भविष्याची तयारी करून ठेवणारी..
स्वतः बरोबर दुसऱ्यांचा सुद्धा विचार करणारी..
ती तुमच्या आमच्या सारखी साधी माणसं
असतात.. चांगल्याला चांगलं म्हणणारी..
काही अभद्र घडलं तर हळहळणारी..
मनातील भावना निखळपणे व्यक्त करणारी..
ती तुमच्या आमच्या सारखी साधी माणसं
असतात.. रांगेत थांबणारी.. महागाई वाढली
तरी.. तक्रार न करणारी.. सरळ मार्गी चालणारी..
वाकड्यात न शिरणारी.. झालेच चुकीचे तर माफी
मागून वेळ मारून नेणारी.. ती तुमच्या आमच्या
सारखी साधी माणसं असतात.. देश चालवणारी.





# ग्रेट बाप...तेथे कर माझे जुळती



सिद्धेश्वर पवार
संपर्क क्र. 9422880080

आधुनिक केसरी

**स्वतःपुरत जगणारी माणसाचं जिकडे तिकडे बघायला मिळतात. स्वतःच्या कुटुंबाच्या पलीकडे जाऊन इतरांसाठी जगणारी माणसं समाजात बोटावर मोजण्याइतकी आहेत. फारसी प्रसिद्धी नसलेले,दूरवर माहिती नसलेले समाजात अनेकजण आहेत. पण त्याचं कार्य प्रसिद्धी माध्यमांच्या नजरेतून सुटते किंवा माध्यमांची नजर त्यांच्या कार्यावर पडत नसल्याने बाहेरच्या जगापर्यंत त्यांचं कार्य पोहचत नाही आणि विशेष म्हणजे प्रसिद्धीची हाव नसलेला अनाथांचा बाप मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्यात मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम ह्या छोट्या गावात असून ह्या बापमाणसाचे कार्य शब्दातीत आहे.**

अनंत शेळके नावाचा जिल्हा परिषद शिक्षक असलेला हा बापमाणूस 41 अनाथ मुलांचा बाप आहे.हा कुणाला वर्गणी मागत नाही, कुणाकडे मदतीची याचना करत नाही. रोख रक्कम कुणाकडूनही स्वीकारत नाही. ज्यांना ज्यांना अनंत शेळके यांचे निस्वार्थ कार्य माहीती आहे,अशी समाजातील दाते मंडळी आपल्या वाड-वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ किंवा आपल्या मुलांच्या,स्वतःच्या वाढदिवसानिमित्त कधी त्या मुलांना अंगावरील कपडे देतात,तर कुणी महिन्याचा किराणा आणून देतात.कुणी शालेय साहित्य देतात.'जो देगा उसका भला,जो ना देगा उसका भी भला' ह्या उक्तीप्रमाणे तो सतत कार्यरत असतो. आपल्या कडील मुलांचा उदरनिर्वाह करणे किंवा त्यांना शिकविणे एव्हडे मर्यादित ध्येय तो बाळगून नाही. तर मुलांना सुसंस्कारित करत त्यांच्यातील कलागुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे शिवधनुष्य तो हसत हसत पेलतो आहे. बंग दाम्पत्य असेल,आमटे कुटुंब असेल अथवा इतरांचे सामाजिक कार्य,त्यांचा त्याग याबाबत कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. त्यांचे कार्य दखलपात्र आहेच यात तिळमात्र संशय नाही.पण आपल्या अवती भोवती देखील बंग,आमटे यांना आदर्श मानून कार्य करणारे आहेत.कुठलेही शासकीय अनुदान न घेता प्रसंगी कर्ज काढून अनंत शेळके नावाचा केवळ चाळीशी पर्यंत पोहचलेला बाप ह्या मुलांचे पालकत्व तल्लीन होऊन आणि ही आपलीच मुले आहेत असे समजून एखादा बाप आपल्या पोटच्या मुलांचे जसे लाड पुरवितो तसा लाड पुरवत त्यांना योग्य ते वळण लावून उद्याचा भारत घडवतो आहे. त्यामुळे गायन, वादन, वक्तृत्व, सूत्रसंचालन, खेळ ह्या सगळ्याच क्षेत्रात अनंत शेळके यांची मुलं अग्रेसर आहेत. अनंत शेळके साने गुरुजी नसेल,पण त्या पाय ठशावर तो चालतो आहे. मी एव्हडे काहीतरी करतो किंवा माझ्या कामाची लोकं स्तुती करतात म्हणून त्याच्यावर कुठलाही फरक पडत नाही. प्रसिद्धीसाठी कधीच न हापापता, निस्वार्थपणे तो मुलांना घडवतो आहे. कुणाचे आई वडील हयात नाहीत,कुणाची आई सोडून गेली,बाप मनोरुग्ण, कुणाच्या आई वडिलांचा असाध्य रोगाने मृत्यू झाला,कुणाला आपल्या नात्यातील अनाथ मुलं सांभाळणे जड झाले,हक्काच कुणीही नाही अशी त्या अर्थाने बेवारस असलेली मुलं तो सांभाळतो आहे. कुणी इंग्रजी मध्ये भाषण करतो,तर कुणी हिंदीत,कुणी संस्कृत मध्ये तर कुणी मराठीत. ज्या मुलांचे पालकत्व अनंत शेळके यांनी स्वीकारलेले आहे. केवळ त्यांच्या पुरते काम न करता परिसरातील तिशी पर्यंत जाऊन पोहचलेली तरुणाई देखील अनंत शेळके यांच्या एका निरोपावर एकत्रित येऊन सामाजिक कार्यात आपले योगदान देते. अनंत शेळके यांच्या कार्याविषयी भाष्य करायला कालचे निमित्त महत्त्वाचे ठरले. सिंदखेडराजा तालुक्यातील वरोडी येथे काल 1 डिसेंबर रोजी परमहंस तेजस्वी महाराज यांचा ८७ वा जन्मोत्सव पार पडला. यानिमित्ताने वरोडी येथे यात्रेला लाखो भाविक येत असतात. आपल्या सोबत शिकणारी मुलं त्यांच्या आईबाबा सोबत यात्रेला गेल्याने अनेक चिमुकल्यानी वरोडी च्या यात्रेला जाण्याचा आग्रह धरला. बापाचं काळीज असलेल्या अनंत शेळके यांनी काही चिमुकल्या मुलांना सोबत घेऊन वरोडी चि यात्रा गाठली. साडे 3 किमी पासून वाहने एका शेतात पार्किंग चि व्यवस्था करण्यात आली होती. वाहने समोर जात नसल्याने प्रत्येकाला साडे 3 किमी पर्यंत पायी जावे लागले व परत आपल्या वाहनापर्यंत किंवा बसस्थानका पर्यंत यावे लागले. आपल्याकडील एक दोन-अडीच वर्षाचा चिमुकला,की ज्याचे वडील मनोरुग्ण आहेत म्हणून आई बापाला अन त्याला देखील सोडून गेली,त्या चिमुकल्या ला आपल्या कडेवर घेऊन ह्या ग्रेट बापाने यात्रेत फिरवले अन त्याला खेळणी देखील घेऊन देत त्याच्यासह सोबतच्या सर्वच मुलांचे लाड पुरविले. जिथे पोटच्या लेकराचे ओझे घेऊन चालणे शक्य नसतांना हा 41 लेकरांच्या आयुष्याचे ओझे घेऊन त्यांचे भविष्य घडवितो आहे,अशा बापमाणसास माझा सॅल्युट. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते
येथे कर माझे जुळती.. अनंत शेळके ह्या बाप माणसाचा पत्ता व भ्रमणध्वनी खाली देत आहे.

**-अनंत शेळके, नित्यानंद आश्रम, विवेकानंद नगर हिवरा आश्रम ता मेहकर जिल्हा बुलढाणा, मो.नं. 93738 36853**



तुकारामनीती
भाग 36

# सेंदरीं हेंदरी दैवतें। कोण तीं पुजी भुतेंकेतें।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकाराम गाथा हा महाराष्ट्रातील घराघरांत स्वर्ग निर्माण करण्याचे महत्तम साधन आहे! गाढवाचे घोडे करण्याची म्हणजेच अज्ञानी जीवाला प्रज्ञावंत करण्याची अद्भुत शक्ती तुकोबांच्या अभंगांत आहे! गाथ्यातील विविध प्रकरणे जी अभ्यासक मंडळींनी वाचकांच्या हाती दिली आहेत ती प्रकरणे आणि त्यातील निवडलेले अभंग हे त्या त्या प्रकरणात अगदी तंतोतंत बसणारे आहेत. आत्तापर्यंत आपण गाथ्यातील विविध प्रकरणे आणि त्यातील काही निवडक अभंगांवर चिंतन करण्याचा प्रयत्न केला आहे. तुकोबांच्या गाथ्यातील आणखी एक ५४ अभंगांचा गाथा म्हणजे त्यांचे 'नाटाचे अभंग' होत. तुकोबांच्या नाटाच्या अभंगांचे अनेक चिंतक-विचारवंत-प्रज्ञावंत प्रबोधनकार, कीर्तनकारांनी आपापल्या परीने विवेचन ठेवण्याचा प्रयास केलेला असतांना मी पुन्हा या महानुभावांच्या पावलावर पाउल टाकून तुकोबांच्या अभंगांनी कृपांकित होत आहे! तुकोबांवर लिहितांना हल्ली त्यांचा भरपूर सहवास लाभतो आहे. अनेकांगाने तुकोबा मला भेटतात-भावतात! त्यांच्या गाथ्याच्या छत्रछायेखाली कधी थंडी, कधी गर्मी तर कधी काय करावे काहीच सुचत नाही. तुकोबांचा गाथा नेहमीच वाचकाचा माथा शेकून जातो. त्यांच्या अभंगातील अनेक शब्द, संदर्भ अनाकलनीय राहतात.**

आंतरजालावर अहोरात्र शोधून सुद्धा त्या शब्दांचा अर्थबोध होत नाही. त्यांच्या गाथ्यातील नाटाचे अभंग म्हणजे काय? याचा विचार मी करत असतांना काही महाराज मंडळी आणि काही ग्रंथांचा आधार घेतला असता त्याचा अर्थ कळण्यास मदत झाली. नाट म्हणजे नाट लावणे असा अपशकून-नकारात्मकता वगैरे काही नाही. तुकोबाराय 'अवघा तो शकून। हृदयी देवाचे चिंतन॥' असा अभंग लिहून आपले शकून-अपशकून संदर्भात मनसुबे उघड करतात. नाट म्हणजे मर्मस्थान असाही उल्लेख श्री ज्ञानेश्वरी ग्रंथात आला आहे, परंतु तो ही संदर्भ इथे जुळत नाही. विविध साधकांच्या विचारांचे अवलोकन केले असताउर्दू, सिंधी, पंजाबी भाषांमधून संतांनी केलेल्या रचनांना 'नाट काव्य' म्हणून संबोधले गेले असून त्या रचनांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की 'आपल्या प्रेषिताचे किंवा ईश्वराचे माहात्म्य वर्णन करण्यासाठी लिहिलेले वाङ्मयम्हणजे 'नाट काव्य' होय.
तुकोबांच्या गाथ्यातील नाटाचे अभंग हे स्वतंत्र चिंतनाचे प्रकरण असून या सर्वच अभंगातून तुकोबांची सगुण भक्ती अनुभवास येते. या ५४ नाटाच्या अभंगात महाराज विविध प्रकाराने आपली ईश्वरनिष्ठा प्रकट करतांना दिसतात. नाटाचे हे ५४ अभंग विविध विषय घेऊन आपली भूमिका मांडतात. त्यातील अभंग हे उपदेश, जागृती, विवेक, साधना, पश्चाताप, आराध्य निश्चिती, शरणांगता, निष्ठा, प्रार्थना, कृतार्थता, साधन महिमा, संत महिमा इत्यादी विषयाच्या अनुषंगाने आलेले आहेत. या नाटाच्या अभंगातील ११ व्या क्रमांकाचा हा
सेंदरीं हेंदरी दैवतें । कोण तीं पुजी भुतेंकेतें ।
आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥१॥
आपुले इच्छे आणिकां पीडी । काय तें देइनल बराडी ।
कळों ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धी अधरा ॥धृ.॥
दासीचा पाहुनरउखतें। धणी देइल आपुल्या हातें ।
करुणाभाषणउचितें । हें तों रितें सतंत शक्तीहीन ॥२॥
काय तें थिल्लरीचें पाणी । ओठ न भिजे फिटे धणी ।
सीण तरीं आदीं आवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ॥३॥
विलेपनें बुजविती तोंड । भार खोल वाहाती उदंड ।
करविती आपणयां दंड। ऐसियास भांड ह्मणे देव तो ॥४॥
तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन ।
तुका ह्मणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळें ॥५॥
अभंग तुकोबांची रोकठोक नीती सांगून जातो. सतराव्या शतकात धर्मक्षेत्रात हाहाकार माजला होता. कर्मकांड, थोतांड, बुवाबाजी, फसवेगिरी, गंडे-दोरे, काळी-पांढरी जादू, वृत्तवैकल्ये आदींचे स्तोम माजले होते. धर्माने सगळीकडे व्यापार मांडला होता. गावोगाव भोंदू-बुवांची निर्मिती झाली होती. याच भोंदूबाबांनी आपल्या पोटाची तुंबडी भरावी यासाठी विविध देवीदेवतांची निर्मिती केली. या मानवनिर्मित आणि कोणत्याही विचाराचे अधिष्ठान नसलेल्या देवदेवतांना भोळा-भाबडा समाज बळी पडायला लागला. या शेंदराच्या हेंदऱ्या दैवतांना खेड्यापाड्यातील लोक नवस करायला लागले. हे फसवे, खोटारडे देव मग आपल्या भक्तांकडे कोंबडे-बकरे अशाप्रकारचा बिबत्स नैवद्य मागायला लागले. या दैवतांच्या भक्तांच्या अंगात देव यायला लागला. डोळे असून तमाम समाज आंधळा बनला होता. लोकांचा विवेक हरवला होता. 'तुकाम्हणे कैसे आंधळे हे जण। गेले विसरून खऱ्या देवा॥' प्रमाणे सामान्य माणूस भरकटला होता. समाजाची ही विपन्नावस्था पाहून तुकोबाराय व्यथित झाले.



त्यामुळे त्यांनी सामान्य माणसांचे, बायाबापड्याचे डोळे उघडण्यासाठी हा अभंग लिहिला.
देवाची नैतिक भीती असावी. ज्याची भौतिक भीती वाटते तो देव असूच शकत नाही. देवाचे अस्तित्व मूर्ती, मंदिरात नसून त्याला आकळण्याचे ठिकाण म्हणजे माणसाचे निर्मळ हृदय! आपल्यातील देव सोडून दुर्दैवाने माणूस बाहेर देव शोधायला लागला. तीर्थाटन करण्यासाठी अहोरात्र भटकंती करायला लागला. यातून तो आणखीनच खऱ्या देवापासून दुरावला. या संदर्भाने अनेक भोंदू-पोटार्थी बाबा-बुवांनी देवाचा चुकीचा पत्ता सांगितला आणि अक्षरशः लोक तिकडे सैरावैरा पळायला लागले. लोकांनी आपली सदसद्विवेकबुद्धी गहाण टाकली. अशा भरकटलेल्या लोकांना तुकोबाराय वरील अभंगाद्वारे उपदेश करतात. ज्या देवता आपले पोट भरू शकत नाहीत त्या जनसामान्यांचे काय कल्याण करणार? "आड वाटें जातां लावी नीट सोई । धर्मनीति तेही ऐसी आहे॥" असे लिहून त्यांना योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न महाराज करतात. जी दैवते आपल्या इच्छेसाठी इतरांना पिडा देतात ते कसले आले देव? त्यासाठी तुकोबाराय अनेक दाखले देतात. जसे एखाद्या घरातील मोलकरीण कसा पाहुण्यांचा पाहुणचार करेल? एखादा व्यक्ती स्वतःच अशक्त आहे, तो इतरांना काय संरक्षण देणार? ज्याच्याकडे घोटभर पाणी नाही तो काय लोकांची तहान भागवणार? जे स्वतःच दंडण करून घेतात ते इतरांचे काय दंड माफ करणार? अशा भोंदू, थोतांड, पोटभऱ्या, लालची देवांना आणि त्यांच्या लोभी-लांडग्यांना तुकोबाराय हलवून जागे करतांना सांगतात, असा देव या जगात कुठेच नाही आणि असणारही नाही. देव काही बाजारचा भाजीपाला नसून ती एक अनुभूतीजन्य अवस्था आहे याचे प्रतिपादन करतात. देव ही सामान्य माणसांच्या मनातील उदात्त भावना असून तो जनी जनार्दन सर्वांचे कल्याण करणारा आणि कुणाकडून कसलीही अपेक्षा न ठेवणारा देव हाच खरा देव आहे आणि तो म्हणजे पंढरपूरचा श्री विठ्ठल आणि आपापल्या घरातील आई-वडील! या खेरीज इतर सगळी व्यापाराची ठिकाणे आहेत.
जिथे लोक लोकांना काही-बाही सांगून लुटतात तिथे कधीही देवाचे अस्तित्व असूच शकत नाही. आपल्या नाटाच्या अभंगात असे अभंग लिहून भोंदुगिरी करणाऱ्या बुवा-बाबांना मात्र खऱ्या अर्थाने तुकोबा नाट अथवा सुरुंग लावतात. त्यांना त्यांच्या दिव्याखालचा अंधार दाखवून देतात. तुकोबांची ही अभंगवाणी म्हणजे समाजाची फसवणूक करणाऱ्या, धर्माच्या चोरांना पाळता भुई थोडी करून टाकते. सतराव्या शतकात सर्वत्र वर्णव्यवस्थेचे स्तोम माजले असतांना असे अभंग लिहणे सोपे काम नव्हते. कडेकोट धर्म व्यवस्थेचा पगडा असतांनासुद्धा तूकोबांनी आपल्या विचारांशी कणभर प्रतारणा केली नाही. या लेखन-कीर्तनाचे परिणाम म्हणजे धर्ममार्तंडांनी तुकोबांना लाठ्याकाठ्यानी मारले. त्यांचे अभंग इंद्रायणीत बुडवून टाकले. परंतु माणसे मारल्याने विचार मारत नसतो हे त्यांना माहित नव्हते. जेवढ्या ताकदीने तुकोबांना संपवायचा प्रयत्न केला गेला त्यापेक्षा हजारपटीने तुकोबांच्या विचारांनी उसळी घेतली आणि बुडवलेले अभंग अजरामर झाले. इथेच तुकोबांचा खऱ्या अर्थाने विजय झाला!
आज तुकोबा आपल्यातून जाऊन जवळपास चारशे वर्षांचा महाकाय काळ लोटला असला तरी तुकोबांचा एक अभंग गळ्याखाली ढकलायला जीव कसानुसा होतो. हीच तुकोबांची खरी विचारक्रांती आहे. तुकोबा काळाच्या मुंडक्यावर पाय देऊन आपल्याशी आजही तेवढ्याच ताकदीने संवाद साधतात. आज घराघरांत साधनांची अक्षरशः गर्दी झाली आहे, परंतु तो खऱ्या सुखाला पारखा झाला आहे. आज माणूस देवाच्या शोधात रानोमाळ भटकत आहे. आजही लोक नवस-सायास करतांना पाहून त्यांची कीव येते. चांगले शिकले-सवरलेले लोक देवाला साकडे घालतात आणि नवस फेडायला जातात. यापेक्षा मोठा विनोद तो काय असावा? आज समाजाला तुकाराम महाराजांच्या विवेकशील विचारांची नितांत गरज आहे. वारकरी संप्रदायाशी पाईक असणारी धुरंधर मंडळी सगळीकडे कीर्तनाचे कार्यक्रम करत फिरताहेत. संप्रदायाचा वेल फोफावलेला पाहून मोठा आनंद होतो, परंतु या वेलीला फुले आणि फळे ही ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांची लागावीत ही सरळ साधी अपेक्षा! आज निरपेक्ष भावनेने परमार्थ करून आपला संसार आणि भोवताल आनंदी करण्याचे काम माझ्यासह तमाम लोकांनी करण्याची आवश्यकता आहे. आज सगळीकडे विचारांचा झगमगाट सुरु आहे, मात्र त्याप्रमाणात त्याची अमलबजावणी होतांना दिसत नाही. वर्तमानात तुकोबांच्या सडेतोड विचारांची गरज असून त्या अनुषंगाने त्यावर लेखन-चिंतन होणे आवश्यक आहे. थोतांड, कर्मकांड याच्या पाठीमागे न लागता मानवाने विवेक-विचाराने वर्तन करून संत विचारांची कास धरावी ही माफक अपेक्षा! असे झाल्यास खऱ्या अर्थाने या तुकाराम नीतीचे सार्थक होईल! जय तुकोबाराय!

# कृषक बांधवांनो, माती दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**माती परीक्षणानुसार खताचे व्यवस्थापन केल्यास जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवणे व पिकांचे उत्पादन वाढणे व खर्चाची बचत होणे यांस मदत होणार आहे. सर्व जिल्ह्यात मृद आरोग्य पत्रिका अभियान राबविणे आवश्यक असून यामध्ये बागायत क्षेत्रातून २.५ हेक्टरला १ प्रातिनिधीक मृद नमुना व जिरायत क्षेत्रातून दहा हेक्टरला एक प्रातिनिधीक नमुना घेतला जावा व त्या परीघ क्षेत्रामध्ये सामाविष्ट सर्व शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिका देण्यात याव्यात. या मागणीसह माहितीपूर्ण असा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा सुंदर लेख शेतकरी बांधांच्या सेवेशी समर्पित.**

रासायनिक खते आणि किटकनाशकांचा बेसुमार वापर आणि पाण्याच्या अतिरिक्त वापराने जगभरातील अनेक सुपीक जमिनी अनुत्पादक बनल्या आहेत. त्यामुळे माती- मृदेच्या जैविक गुणांचा ऱ्हास होत आहे, मातीच्या प्रदूषणात वाढ होत आहे. त्याचा परिणाम जगातील अनेक देशांच्या अन्नसुरक्षेवर झाल्याचं दिसून आलंय. भारतातही मृदेचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत आहे. मृदेच्या संवर्धनासाठी भारत सरकारतर्फे सन २०१५ साली सॉइल हेल्थ कार्ड ही योजना सुरु करण्यात आली आहे. त्या माध्यमातून मृदेचे स्वास्थ्य टिकवणे, शेतीच्या शाश्वत विकास करणे आणि त्याद्वारे अन्नसुरक्षा करणे हा उद्देश आहे. आपल्यासाठी का महत्वाचा आहे जागतिक मृदा दिवस? मृदेचे स्वास्थ्य टिकवणे आणि तिच्या शाश्वत व्यवस्थापनेच्या प्रक्रियेसाठी जागरुकता निर्माण करणे हा उद्देश जागतिक मृदा दिवस साजरा करण्यामागे आहे. माती हा अत्यंत महत्त्वाचा पण नेहमीच दुर्लक्षित राहिलेला स्त्रोत आहे. या घटकाकडे जगभरातील लोकांचे लक्ष वेधणे तसेच मातीच्या संवर्धनाची असलेली गरज याबाबत जनजागृती करणे यांसाठी हा जागतिक मृदा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आरोग्यदायक माती हा आरोग्यदायक अन्न निर्मितीचा पाया आहे. विविध पिके आणि शेती यांचा पाया माती आहे. अन्नधान्याच्या ९० टक्के गरजा मातीद्वारेपूर्ण होतात. जंगले वाढविण्यासाठी मातीचीच आवश्यकता असते. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैव विविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी अडविण्याची, साठविण्याची आणि शुद्ध करण्याची क्षमता आहे. माती अमूल्य आहे. अन्न, वस्त्र व निवारा या आपल्या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आधुनिक युगात मातीविना शेती यासारख्या संकल्पना उदयास आल्या असल्या तरी जगातील महाकाय लोकसंख्येचे पोट भरण्याचे सामर्थ्य यामध्ये नाही. माती कारखान्यांत तयार होत नाही. माती तयार होण्यासाठी हजारो वर्षाचा कालावधी लागतो. ऊन, वारा, पाऊस व पाण्याचा प्रवाह अशा विविध गोष्टींचा परिणाम खडकांवर झाला. खडकांची झीज होऊन माती तयार झाली. लाखो वर्षे ही प्रक्रिया सुरू होती. साधारण १ सेंमी मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्ष लागतात. या मातीमध्ये मृत प्राण्यांचे अवशेष प्राण्यांची विष्टा, कुजलेल्या वनस्पतींचे अवशेष असतात. सेंद्रिय पदार्थ व खनिज पदार्थ अशा दोन प्रकारच्या पदार्थांनी माती बनते. अनेक मातीचे कण मिळून जमीन तयार होते. जमिनीतील दहा ते पंधरा सेंमी मातीचा थर हा पृथ्वीवरील जीवांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा भाग असतो. दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नसुरक्षेच्या दृष्टीने मृदेचं महत्व अन्यसाधारण असं आहे. अलिकडच्या काळात शेतीमध्ये वापरण्यात येणारी भरमसाठ रासायनिक खते, शहरीकरण आणि उद्योगधंद्यांसाठी करण्यात येणारी जंगलतोड आणि इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज होण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु आहे. केवळ एक इंच सुपीक मृदेचा थर तयार होण्यासाठी आठशे ते हजार वर्षांचा कालावधी लागतो. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होतेय. त्यामुळे यासंदर्भात जागरुकता करण्याच्या दृष्टीने सन २०१३ साली सयुंक्त राष्ट्राच्या महासभेत ५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिवस साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला. फूड अॅन्ड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन- एफएओ अर्थात अन्न आणि कृषी संघटनेच्या वतीनं या दिवसाचे आयोजन केलं जातं. शेतकऱ्यांसोबतच सामान्य माणसांमध्येही मृदेसंबंधी जागरुकता करण्याचा उद्देश त्यामागं आहे. दरवर्षी मृदा दिवस साजरा करताना एक वेगळी थीम तयार केली जाते आणि वर्षभर त्या आधारे मृदा संवर्धनासाठी जागरुकता केली जाते. जसे- "कीप सॉइल अलाइव्ह, प्रोटेक्ट सॉइल बायोडायव्हर्सीटी!" म्हणजे मृदेला जिवंत ठेवा, मृदेच्या जैवविविधतेचे संरक्षण करा. त्या अशाप्रकारच्या थीम्स असतात.

भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परंतु वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, धरण, रस्ते, आदी विविध कारणांमुळे सुपीक जमीन जात असल्याने लागवडीलायक क्षेत्रात घट होत आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला अन्नाची गरज भागविण्यासाठी अन्नधान्य उत्पादन वाढविणे गरजेचे आहे. शेत मशागतीच्या चुकीच्या पद्धती, बेसुमार जंगलतोड, अनिर्बंध चराई, वारा, जोराचा पाऊस आदी कारणांमुळे जमिनीची धूप होते. हजारो वर्षांनी बनलेला हा मातीचा थर नष्ट व्हायला अत्यल्प कालावधीही पुरेसा ठरतो. जमिनीची धुप झाल्यामुळे सुपीक माती वाहून जाते. सुपीक जमिनीबरोबर पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाळू, खडकांचे बारीक तुकडे वाहत येतात व सुपीक भागात पसरतात. यामुळे सुपीक जमीन नापिक होण्याची शक्यता असते. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करू शकत नाही हे वास्तव आहे. यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. भविष्यात जमीन आरोग्याचे निदान करण्यासाठी माती परीक्षण तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्यच होणार असून या पुढील काळात जमिनीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचे गंभीर परीणाम फक्त शेतीवरच न दिसता मानवी शरीर आणि प्राणी इत्यादींना सुद्धा जाणवणार आहेत. ते लक्षात घेऊनच केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात मृद आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम सन २०१५-१६पासून राबविण्यांत येत आहे. या कार्यक्रमात टप्प्याटप्प्याने आगामी दोन वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व गावांची निवड करुन सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची आरोग्य



पत्रिका देण्यात येत आहे. मृद आरोग्य पत्रिकेमध्ये जमिनीतील उपलब्ध अन्न द्रव्यांचे प्रमाण समजणार आहे. या बाबतच्या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना विविध पिकाना योग्य प्रमाणात संतुलीत खते देण्याकरीता होणार आहे. माती परीक्षणानुसार खताचे व्यवस्थापन केल्यास जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवणे व पिकांचे उत्पादन वाढणे व खर्चाची बचत होणे यांस मदत होणार आहे. सर्व जिल्ह्यात मृद आरोग्य पत्रिका अभियान राबविणे आवश्यक असून यामध्ये बागायत क्षेत्रातून २.५ हेक्टरला १ प्रातिनिधीक मृद नमुना व जिरायत क्षेत्रातून दहा हेक्टरला एक प्रातिनिधीक नमुना घेतला जावा व त्या परीघ क्षेत्रामध्ये सामाविष्ट सर्व शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिका देण्यात याव्यात. मृदेचं महत्व- मृदेचं संरक्षण म्हणजे संपूर्ण सजीवांचं संरक्षण असाच अर्थ होतोय. जगातील ९५ टक्के अन्नधान्य मृदेच्या माध्यमातून येतं. तसेच मृदेत पृथ्वीवरील एकूण सजीवांपैकी २५ टक्के सजीव आसरा घेतात. फळे, भाज्या आणि अन्नधान्याची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्तेवरुन ठरते. सद्या या मृदेच्या संवर्धनासमोर वातावरण बदलाचं मोठं आव्हान उभं आहे. मृदा प्रदूषण टाळायचं असेल तर काय करावं? अलिकडे मोठ्या प्रमाणावर मृदेचं प्रदूषण होताना दिसतंय. ते टाळायचं असेल तर काही पाऊलं उचलली पाहिजेत. प्लॅस्टिकचा वापर कमी केला पाहिजे. त्या ठिकाणी पर्यावरणपूरक उत्पादनांचा वापर करायला हवा. आपल्या वाया जाणाऱ्या खाद्य पदार्थांचं रुपांतर कंपोस्ट खतात करायला हवं. शाश्वत शेतीसाठी अन्नद्रव्यांचे योग्य व्यवस्थापन आणि जमिनीची सुपिकता यांचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. सेंद्रीय खतांच्या वापराचा अभाव, असंतुलित खत पुरवठा, पीक फेरपालटीचा अभाव इत्यादीमुळे जमिनींचे गुणधर्म बदलत असून मोठ्या प्रमाणावर अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येत आहे. जमिनीची सुपीकता खालावत चाललेली असून तिचे आरोग्य बिघडत असल्याचे दिसून येत आहे. सेंद्रीय कर्बाचे जमिनीतील प्रमाण गांभीर्याने घटत चाललेले आहे. हवामान बदलाचा परिणाम म्हणून काही विपरीत बदल देखील जमिनीच्या गुणधर्मात होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी वापरण्यांत येणाऱ्या किंमती निविष्ठांचा प्रभावी वापर होत नसून फक्त खर्चात वाढ होऊन शेतीचा किफायतशीरपणा कमी होत आहे. वर्षानुवर्ष शेतकरी जमिनीत विविध पिके घेत आला आहे. पुर्वीच्या काळात सेंद्रिय पदार्थ मुबलक प्रमाणांत उपलब्ध होते व ते जमिनीत टाकण्याचे प्रमाणसुद्धा जास्त होते. त्यामुळे जमिनीत पोत टिकण्यांस आपोआपच मदत होत असे. देशाची लोकसंख्या वाढल्यामुळे अन्नधान्याची गरज वाढू लागली त्या प्रमाणात शेतामधून अधिक उत्पादन वाढविण्याकडे कल वाढत गेला. हरित क्रांतीनंतर अधिक उत्पादन देणाऱ्या तसेच संकरीत वाणांचा वापर मोठ्या प्रमाणात होत गेला. अधिक उत्पादन देण्यासाठी रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला. सिंचनाच्या विविध सोयी उपलब्ध झाल्यामुळे बागायत क्षेत्रात सर्व हंगामात पिके घेण्यात येऊ लागली. पर्यायाने पीक घनता वाढून रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तसेच रासायनिक खतांच्या किंमती वाढल्यामुळे शेतकरी कमी किंमतीच्या खतांचा वापर करू लागला. रासायनिक खतांच्या असमतोल वापरामुळे काही मुलद्रव्यांची जमिनीत कमतरता जाणवु लागली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करुनही उत्पादकता वाढीस मर्यादा आलेल्या आहेत. जमीन हा मर्यादीत स्वरुपाचा नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याची योग्य जोपासना करुन भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. यासाठी स्थानिक गरजेनुसार योग्य व्यवस्थापन पद्धतीचे अवलंबन करण्याची गरज आहे. जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड, माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर, पिकांची फेरपालट, सेंद्रिय खतांचा नियमित वापर, इत्यादींचा वापर करुन जमिनीची सुपिकता टिकवुन ठेवणे आणि प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. सर्व शेतकरी बंधुना विनंती आहे की, आपण आपल्या शेत जमिनीचे नियमीत माती परिक्षण करून आपल्या जमिनीची सुपिकता जाणून घ्यावी व त्यानुसारच पिकांना खताची मात्रा द्यावी. जेणे करुन जमिनीचे आरोग्य अबाधित ठेवून आपणास आधिक उत्पादन घेता येईल व जमीनीच्या आरोग्याबरोबरच मानवी आरोग्याचेही जतन होईल. चला तर मग, आपण सारे मिळून शासनाच्या मृद आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रमात सहभागी होवून साजरा करुया मृदा दिवस!

# रम्य (नव्हं) ते बालपण



आहेर वा. र.
संपर्क क्र.: 9958782982

आधुनिक केसरी

**मुखेड तालूका येवला या ग्रामीण भागात जन्मलेला मी, जिथे दुष्काळ पाचवीला पुजला जातो. तिथे रम्य ते बालपण ही माझ्यासाठी कविकल्पनाच होती. सुखदु:खाच्या पुसट सीमेवर लहानपणी वावर होता. तरीही काही चांगल्या वाईट घटनांचा निर्देश करणे क्रमप्राप्त ठरेल. माझे नाव वाळू रघुनाथ आहेर. मराठी शाळेतील मास्तरांनी घरी येवून, वडीलांना सांगितले की याला उद्यापासून पहिलीच्या वर्गात पाठवा. यानंतर सात वर्षानीं सातवी पास झाल्यावर कळले की माझी जन्म तारीख मास्तरांनी 2/7/1854 अशी नोंदवली होती.**

थोडक्यात सांगायचे तर अस्मादिकांचा जन्म अशिक्षित शेतकरी कुटुंबात झाला. तेंव्हा आमचे एकत्र कुटूंब होते.आईवडील, दोन काका काकी, आजी आणि आम्ही सख्खे चुलत आठ भावंडे असेपंधरा जण होते. सोळा एकर जिरायत शेती वडील कसायचे. मोठेदोन काका सालकरी म्हणून भावकीत काम करायचे. आई आणि काकू रोजंदारीने दुस-यांच्या शेतात कामाला जायच्या. जिरायत शेतीचे फारसे उत्पन्न नसे. काकाच्या दर महिन्याला मिळणा-या धान्यमजुरीवर गुजराण होई. लहानपणी माझी प्रकृति किडकिडीत असल्याने आजारपणवरचेवर असायचे.दवाखाना 5/7मैलावर देवगावला काका आणि आई यांना मला घेऊन पायी जावे लागे. मोठे काका कारभार बघायचे. त्यांना सर्व दादा म्हणायचे.घरात आमच्या आजीचा दरारा असे. आम्ही 5-6जण मराठी शाळेत जायचो. आम्हाला शाळेसाठी दोन ड्रेस शिवायचे.खाकी हाफ पॅन्ट आणि पांढरा हाफ शर्ट साठी कपड्याचा तागा आणायचे.तेच इतर वेळेसही वापरले जायचे. दादा दरवर्षी पाटीवरच्या पेन्सिलचेहीमोठे बॉक्स, वह्या आणि शाईची मोठी एक लिटरची बाटली आणायचे. त्यातून जरूरीप्रमाणे आम्हाला आजी देत असे. आजीकडे धान्यसाठा, चहासाखर, खोबरेल तेल यांचे नियोजन असे. रोज सकाळी आजी चहसाखर पेटीतून काढून चहासाठी देत असे. मग सर्व लहानथोरांसाठी एकदाच चहा व्हायचा. पाहुणे आले तरच दुसऱ्यांदा चहा होत असे.साधारण दहा बारा दिवसांनी गिरणीतून दळण दळून आणण्यासाठी आजीला धान्याचे डबे न्यायलाआणायला मी मदत करायचो. किराणा दुकानातून सामान आणायला,बाजारच्या दिवशी,बाहेरगावी जातांना आजी मला खासकरून पैशाच्या हिशोबासाठी बरोबर नेत असे. आजी बाजारच्याखाऊचे आम्हा सर्व भावांना वाटप करी. इतर दिवशी शाळा सुटल्यावर आजी शेंगा,हुरडा यारखा खाऊ देई. मला साधारणपणे पहिलीपासूनचे लहानपणआठवते.पहिलीपासून माझा पहिला नंबर कायम अकरावीपर्यंत कायम होता. तसेच मॉनिटरही मीच होतो. पहिलीपासूनच्या वर्गशिक्षकांची नावे आजही डोळ्यासमोर उभे राहतात. भंडारेबाई, ठोंबरेगुरूजी, पाटील गुरूजी, चतुरगुरूजी, नाईक गुरूजी, गुरव गुरूजी. हेडमास्तर लोहारकर गुरूजी, नंतर जाधव गुरूजी होते. तेव्हा शाळा गावतील मंदिरात भरत होत्या. विठ्ठल मंदिर, राम मंदिर, मारूती मंदिर पांडुरंग महाराज मंदिर जांभळी शाळा आणि चावडीत वर्गभरायचे. तेव्हा शिक्षकांविषयी आदरयुक्त भीति वाटायची. शिक्षकवर्ग अत्यंत कळकळीने शिकवायचे. सुटीच्या दिवशी विटीदांडू,सुरपारंब्या सारखे सांघिक खेळ खेळायचो. माझीआई मितभाषी होती. मला लहानपणी फार जपायची. वाहतुकीची साधने नसल्याने मामाच्यासायाळे गावी जाण्यासाठी गावातील



कासाराची बैलगाडी बाजारासाठी कोळपेवाडीला जायची. त्या बैलगाडीने कोळपेवाडीला आईसोबत जायचो. तिथे कॅनालच्या कडेस आंब्याच्या झाडाखाली भाकरी खायची. कॅनालचे पाणी पिऊन ऊन कमी झाल्यावर पायी सायाळेकडे निघायचो. वाटेत शहाजापूर, कोळगाव, पाथरे गावेयेत. वळसे घालून कॅनाल तीनदा भेटायचा. पायी- पायी जात दिवस बुडायला मामाकडे सायाळेला पोहेचलो की बरंवाटायचं ,पण पाय खुप दुखायचे.दिवाळीला आठ दिवस मुक्काम व्हायचा. आजी लाड करायची. मामाच्या मळ्यात मोटेचे पाणी बघायचे. बोरं गोळा करायची.मामा मंगळवारी वावी बाजारातून आईला मला नवे कपडे आणायचे. गोसावी शिंप्याकडून दोन दिवसात शिवायचे. परत रविवारी मामा बैलगाडीने कोळपेवाडीलाआम्हा दोघांना आमच्या गावच्या कासाराच्या दुकानावर सोडायचा. मग आमची वरात कासाराच्या बैलगाडीने परत मुखेडला यायची.पुढे मी मोठा झाल्यावर लहान भावांना घेऊन तिचा माहेरचा प्रवास चालू होता. चौथीला नवीन मराठी शाळा गावाबाहेर सुरू झाली. तिथे सुतकाम-विणकाम विषय शिकलो.रात्रीअभ्यासासाठी कंदील वापरायला मिळायचा म्हणुन मी गल्लीतील मित्रांकडे रात्रीअभ्यासालाजायचो.सातवीलातरनाईकगुरूजीच्या घरीरात्रीअभ्यासासाठीमुक्कामअसायचा.सातवीला लासलगावला परीक्षेसाठी मुक्कामाला तीन दिवस होतो. लासलगाव केंद्रात मे68मध्ये माझा दुसरा नंबर आला होता. गावांत आणि शाळेत तसेच घरीही माझे खुप कौतुक झाले. गावात जुन67ला मविप्र चे हायस्कुल सुरू झालेले होते.मला गावातील हायस्कुलमध्ये सहज प्रवेश मिळाला. वर उल्लेख केलेली माझी जन्मतारीख मराठी शाळेतुन शाळा सोडल्याचा दाखला हायस्कुलमध्ये देण्यासाठी आणला, तेव्हा कळाली. आठवीला बेंचवर बसायला मिळाल्याने आनंद वाटला. तासातासाला वेगवेगळे सर यायचे मोठी मजा वाटायची. आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी पण हायस्कुलमध्येआले होते .ओळख झाल्यानंतर सर्वजण मित्र झाले ते आजतागायत.त्यामध्ये भगवानशेट कासार, अशोक कुलकर्णी, बाबुराव शेळके, गंगाधर शेळके, अर्जुन शेळके, माधव आहेर,उत्तम देवरे, हमिदुल्लाभाई, कारभारी आहेर,रामदास आहेर, वसंत आहेर, भागवत आहेर, विलास आहेर,लक्ष्मण बडवर, सुनिल बडवर, सुभाष बडवर आणि आणखी खुप सारे. सहा महिन्यात हेडसर आहिरेसरांचा आवडता विद्यार्थी झालो. इतर सरही मला आपुलकीने वागवीत होते. 69साली महात्मा गांधी जन्मशताब्दीनिमित्त देवगाव हायस्कुलमध्ये व्याखानस्पर्धेत मुखेड हायस्कुलच्या वतीने भाग घेतला.त्यास्पर्धेत माझा दुसरा नंबर आला. हायस्कुलमध्ये माझे हेडसर आहिरेसरांनी अभिनंदन केले. वर्तमानपत्रे वाचण्यासाठी बरेचदा आहिरेसरांकडे घरी जाई. याचकाळात घरी आमचे काका आणि वडील हे विभक्त झाले. वडील व्यसनी असल्याने घरीआर्थिक ओढताण सुरू झाली.त्यामुळे सुटीच्या काळात रोजंदारीवर शेतीकामाला जायचो. कधी दुष्काळात रोजगार हमीच्या सडकेवर,विहीर खोदाईच्या कामावरही जायचो. दरम्यान वडीलांनी गावगुरांचे शेण गोळा करण्याचा लिलाव घेतला. त्यामुळे रोज सकाळी सात ते दहा आणि सांयकाळी सहा ते आठ या वेळात कॅनालच्या बाजुला शेण गोळा करण्यासाठी मी आणि तीन भाऊ रोज जायचो. उन्हाळ्यात हायस्कुलच्या खोल्यांच्या बांधकामाला पाणी मारण्यासाठी हेडसर आहिरेसर बोलवायचे. त्यासाठी दिवसभर नदीवरून डोक्यावर पाणी आणावे लागायचे. यादरम्यान आमचा खेळ हाविषय बंद झाला. या परिस्थितीत 9वी-10वी- 11वीअशी तीन वर्षे काढली. 11वीला सुध्दा मी 74.5% मार्क मिळवुन लासलगाव केंद्र आणि मवप्र समाज नाशिक येथे दुसरा नंबर आला होता.

# करणावडी ते जळगाव (जा) बस सुरू करा

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**पिंपळगाव काळे :** गेल्या अनेक वर्षांपासून "करणवाडी' येथील विद्यार्थी 'पिंपळगाव काळे व जळगाव जामोद' या गावी बस ने शिक्षण घेण्यासाठी प्रवास करत होते. परंतु काही दिवसांपासून विद्यार्थी बस सेवेपासून वंचित राहत आहेत व त्यांना शिक्षण घेताना प्रवासासाठी बस नसल्याने उपेक्षित राहावे लागत आहे.
परिणामी काही विद्यार्थ्यांना सायकलने ऑटो ने शाळेत जावे लागत आहे जे की जिवघेणे आहे.
तरीही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करता त् जळगाव (जा) बस डेपो अंतर्गत बस सेवा सुरू करण्यात यावी या साठी आज 'करणवाडी' गावातील विद्यार्थ्यांचे पालक,गावकरी तसेच आम्ही सोबत मिळून बस स्थानक प्रमुखांना रीतसर निवेदन देण्यात आले.
महत्वाचे म्हणजे निवेदन देते वेळीच अधिकाऱ्यांन सोबत चर्चा झाली आणि त्याचक्षणी त्या संबधीत अधिकाऱ्याने येणाऱ्या सोमवारपासून बस सुरू होईल असे सुध्दा सांगितले. निवेदनाचा लगेच स्पॉट निकाल लावण्यात आला. त्या वेळी ता उपाध्यक्ष वंचित श्रीकृष्णा गवई,सारथी फाउंडेशन अध्यक्ष प्रकाश भिसे, सातव सर, अनिल रणीत सर, एकनाथ बोपले, गौतम आठवले, महेंद्र इंगळे, संदीप बारगजे, भगवान भोंगरे, राहुल पातोडे, विजय इंगळे, शांताराम भोपळे, ज्ञानदेव भोपळे, महादेव आठवले, सुभाष शेगोकार, प्रशांत भोजने, दीपक जाधव, रेखा बारगजे इ. उपस्थित होते.





# नेहरू चौक ते टाव रोडची स्वच्छता

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** प्लॉगर ग्रुप आणि सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार मदन रामनाथ लाठी यांचे तर्फे स्वच्छता मोहिमेचा ड्राईव्ह जळगाव शहरात दर रविवारी पमाणे आज सकाळी ७ वाजता नेहरू चौक ते टावर पर्यंत रस्त्याच्या दोघ बाजूला आणि मध्यभागी जे प्लास्टिक होते ते प्लास्टिक गोळा करण्यात आले आणि टॉवर येथे त्याची सांगता झाली. यावरून स्वच्छता मोहिमेचे महत्त्व जनतेने आणि नगर महानगरपालिकेने सहकार्य केले तर आणखी जास्त अभियान राबवू शकू आणि स्वच्छता मोहिमेला वेग येऊ शकेल आणि यश मिळण्यात सहकार्य मिळेल लोकांचे आरोग्यास मदत होईल.
टावर जवळील काही दुकानदारांनी चहा वाले आणि पोहे वाले यांनी हा उपक्रम स्तुत्य असल्याचा सांगितले सिटी पोलीस स्टेशन येथील एक अधिकारी त्यांनी पण हा उपक्रम स्तुत्य असल्याचा सांगितलं या उपक्रमात सर्वांनी सहकार्य करावे असे सांगण्यात आले. प्लॉगर ग्रुप तर्फे रविवारचा सकाळी दीड ते दोन तासाचा हा उपक्रम दहा महिन्यापासून नियमित सुरू आहे दर रविवारी विविध परिसरात जसे मेहरून शिवार, मेहरून गार्डन, स्टेशन रोड , स्टेडियम रोड आणि विविध ठिकाणी घेण्यात येतात आजचा हा उपक्रम नेहरू चौक ते टॉवर असा होता.
याद्वारे एकाच मेसेज आहे की आपले शहर सुंदर स्वच्छ हिरवेगार कसे होऊ शकेल त्यासाठी वरील टीम कार्य करीत आहे त्यासाठी जनतेचे प्रत्येक नागरिकाने आपले नैतिक जबाबदारी समजून कचरा ठराविक ठिकाणीच वेगवेगळ्या सुका कचरा आणि ओला कचरा असा टाकला आणि शासकीय यंत्रणेने सहकार्य केले तर हा उपक्रम जास्त चांगला होऊ शकेल.

# मक्रणपूर येथील जि. प. शाळेमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरालगत असलेल्या मक्रणपूर जिल्हा परिषद शाळेमध्ये जागतिक दिव्यांग दिनानिमित्त प्रभात फेरी काढण्यात आली तसेच तीन डिसेंबर ते 22 डिसेंबर पर्यंत पुढील कार्यक्रमाचे आयोजन केले आहे त्यामध्ये प्रभात फेरी, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, बक्षीस स्पर्धा, इत्यादी स्पर्धेचे आयोजन केलेले आहे ही प्रभात फेरी संपूर्ण गावात काढून शासनाने दिव्यांग व्यक्तीसाठी ज्या ज्या योजना काढलेल्या आहे त्याचा लाभ घ्यावा असेही घोषवाक्य देण्यात आले या प्रभात फेरीचा शाळेमध्ये समारोह करण्यात आला. यावेळी मधुकर पवार मुख्याध्यापक, श्रीमती लता बडक, श्रीमती हर्षिता बैरागी, श्रीमती सुनीता निकम, श्रीमती पूजा मिसळ व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




# लिव्ह इन संबंधातील तरुणाची धमकी! सैरभैर झालेल्या तरुणीची फिर्याद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिल्लीमधील श्रद्धा वालकर हत्या प्रकरणामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. आफताबने श्रद्धाला ज्या पद्धतीनं मारल त्याच्या या क्रूरतेचा सर्व स्थरातून निषेध करण्यात येतोय. ही घटना ताजी असताना धुळ्यात धमकीचा असाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दिल्लीत श्रद्धा वालकरचे ३५ तुकडे झाले, तू आमच्या विरोधात गेली तर तुझे ७० तुकडे करीन, अशी धमकी लग्नाशिवाय एकत्र राहात असलेल्या तरुणाने दिली असल्याची फिर्याद धुळे शहरातील एका २४ वर्षीय तरुणीने पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात नोंदवली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. बुधवारी मध्यरात्री दाखल झालेल्या या फिर्यादीनुसार अर्शद सलीम मलिक नावाच्या लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणाने २ ९ नोव्हेंबर रोजी ही धमकी या तरुणीला दिली. जुलै २०२१ पासून ते दोघे एकत्र राहतात. त्याआधी चार एप्रिल २०१६ रोजी तिचा पहिला विवाह झाला . २०१७ मध्ये तिला मुलगा झाला. सन २०१९ मध्ये तिच्या पतीचे रस्ता अपघातात निधन झाले . त्यानंतर तिची एका अकॅडमी हर्षल माळी नावाच्या तरुणाशी ओळख झाली. त्याने तिला लळिंग येथे नेऊन तिच्यावर अत्याचार केले. त्याची चित्रफीत बनवून तिला धमकावले. त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतल्यावर जुलै २०२१ मध्ये लिव्ह इन रिलेशनशिपबाबत अमळनेर येथे प्रतिज्ञापत्र तयार करायला गेले. ते करताना या तरुणाचे नाव हर्षल माळी नसून अर्शद सलीम मलिक असल्याचे तिला समजले. अर्शदने तिला उस्मानाबाद येथे एका फ्लॅटमध्ये नेले आपल्याला सक्तीने धर्मांतर करायला लावले, पहिल्या पतीपासून झालेल्या मुलाचेही धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाला आणि या तरुणाच्या पित्याने आपल्यावर अनैसर्गिक अत्याचार केले, असेही पीडिताने फिर्यादीत नमूद केले आहे. चार महिन्यांनी अर्शदने तिला धुळे शहरातील विटा भट्टी भागातील घरी आणले. २६ ऑगस्ट २०२२ रोजी तिने दुसऱ्या मुलाला जन्म दिला. त्यानंतरही सलीम बशीर मलिककडून अनैसर्गिक अत्याचार होतच होते. दरम्यानच्या काळात अर्शदने तिचे धर्मांतर करवून घेतले . तिच्या पाच वर्षांच्या पहिल्या मुलाची खतना करण्याचाही प्रयत्न केला. मात्र, त्याला विरोध केल्यामुळे अर्शदने तिला दिल्लीतील श्रद्धा वालकरच्या बातम्यांची आठवण करून दिली. तिचे तर फक्त ३५ तुकडे केले गेले , तुझे आम्ही ७० तुकडे करू, अशा शब्दात त्याने धमकावले असे पीडिताने फिर्यादीत नमूद केले आहे.

# महाप्रयाण दिनानिमित्त शंकरपूर येथे रात्रभर महापरित्राण पाठाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** संविधानाचे जनक बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाप्रयान दिनानिमित्त गंगापूर तालुक्यातील शंकरपूर येथील धम्मसम्राट बुद्ध विहार या ठिकाणी दिनांक 5 डिसेंबर व 6 डिसेंबर रोजी महापरित्राण पाठाचे आयोजन करण्यात आले असून उपासक उपसिका यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भन्ते शाक्यपूत्र अमृतानंद बोधी यांनी केले आहे. मानवाच्या कल्याणासाठी तथागत बुद्धानीं सुख शांतीचा संदेश दिला व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जो धम्म दिला आहे. त्याचे आचरण व्हावे तसेच धार्मिक संस्कार घडावेत त्यासोबतच दान पारमिता पूर्ण व्हावी यासाठी या महापरित्राण पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. मानव जीवनातील दुःख मुक्ती करणे हा धम्माचा केंद्रबिंदू असून त्यासाठी महापरित्राण पाठाचे आयोजन करण्यात आल्याचे भन्ते अमृतानंद बोधी यांनी सांगितले. यात दिनांक 5 डिसेम्बर सोमवार ला सायंकाळी 7 वाजता बोधिवृक्षाचे पूजन करून सायंकाळी 8 वाजता महापरित्राण पाठास सुरुवात होईल तर 6 डिसेम्बर मंगळवारी सकाळी 6 वाजता शील ग्रहण विधी,7 ला संघदान आणि मंगलमैत्री सांगता होणार आहे. याप्रसंगी भन्ते राष्ट्रपाल महाथेरो तेलंगणा,भन्ते गुणरत्न महाथेरो नंदूरबार,भन्ते एस. प्रज्ञाबोधी महाथेरो मावसाळा, भन्ते निर्मलपुत्त आनंद महाथेरो अमरावती, भन्ते बुध्दघोष मेत्ता थेरो पुणे, भन्ते दिपंकर मनमाड, भन्ते काश्यप कोपरगाव,भन्ते अनोमदस्सी गुजरात,भन्ते सुजाततीस्स चंद्रपुर, व प्रमुख भिक्खु संघाचे मार्गदर्शन व उपस्थिती लाभणार आहे तरी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# एन.टी.डी. प्रवर्गातून प्रथम आलेले मुरकुटे यांचा वंजारी सेवा संघाच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत राज्य विक्रीकर निरीक्षक परीक्षेत एन.टी.डी. प्रवर्गातून राज्यात प्रथम आलेले शशिकांत मुरकुटे यांचा लातूर येथे वंजारी सेवा संघाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला
यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री राहुल जाधवर, प्रदेश उपाध्यक्ष भास्कर लहाने, प्रदेश संपर्कप्रमुख सुग्रीव मुंडे, प्रदेश कार्यालय प्रमुख माणिक शिरसाट,महिला आघाडी लातूर जिल्हाध्यक्षा सौ सागरताई नागरगोजे ,सामाजिक कार्यकर्ते श्री भागवत गिते ,कृषी अधिकारी श्री रमेश गुट्टे, प्रा धनंजय बाप्पा बिक्कड,श्री बालाजी नागरगोजे,श्री नामदेवराव घुले,श्री रोहन शिरसाट आदी उपस्थित होते. यावेळी वंजारी सेवा संघाच्या वतीने शाल श्रीफळ पुषगुच्छ हार व राष्ट्रसंत भगवान बाबा यांची प्रतिमा भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री भास्करराव लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री सुग्रीव मुंडे यांनी केले. श्री राहुल जाधवर यांनी वंजारी सेवा संघाची विद्यार्थी हितासाठी करत असलेल्या कामाची माहिती दिली. स्पर्धा परीक्षा देताना स्व नियोजन महत्त्वाचे - श्री शशिकांत मुरकुटे, नूतन विक्रीकर निरीक्षक यावेळी सत्काराला उत्तर देताना श्री शशिकांत मुरकुटे यांनी आज मिळालेले यश हे खूप कष्टाने मिळाले असून यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यास करणे गरजेचे असून स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या तरुणांनी आपला पुढील अभ्यासाचा प्लॅन अगोदरच निश्चित करावा त्यानुसार अभ्यास ,पेपर सोडवणे यातून आपल्या उणिवा शोधव्यात व त्या दूर करण्याचे नियोजन करावे यासाठी मी मदत करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले.



# यशोगाथा : पेरूच्या शेतीने, जीवनात आला गोडवा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबाद तालुका हा तसा जिरायती आहे. येथे सिंचनाच्या सोयी - सुविधा उपलब्ध नसल्याकारणाने पावसाच्या पाण्यावर येणारे पीक घेण्याकडेच सर्वांचा कल असतो.मात्र रत्नाळी येथील प्रयोगशील शेतकरी पुंडलिक पुजरवाड यांनी रुळलेली वाट न चालता शेतीत नव प्रयोग करण्याचा मनाशी निर्धार केला. २०१९ ला पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथून सरदार या वाणाची २५०० झाडें आणून सहा एकर क्षेत्रात लागवड केली.



बघता बघता दोन वर्षात पेरूची डौलदार पीक येण्यास सुरवात झाली असून हा माल थेट सिंकद्राबाद, निझामाबादच्या मार्केट मध्ये पोहचला आहे.यातून लाखो रुपयांचे त्याना उत्पन्न मिळत असून पेरूच्या फोडीने त्यांचे जीवन गोड केले आहे.

**लागवड कशी करावी :** कोणत्याही पिकाच्या यशाचे गमक त्याच्या लागवड पद्धतीत दडले आहे.पुंडलिक पूजरवाड याच्या मते, पेरूची लागवड करताना दोन झाडात सात बाय - दहा असे अंतर असावे यामुळे झाडाची व्यवस्थित वाढ होते.तसेच रोग प्रादुर्भावाचा धोका कमी असतो. त्यांची योग्य निघा राखता येते.

**खत कोणती वापरावी :** हवामान बदल झाला की मानवला जसे सर्दी, खोकल्यासारखे आजार होतात.तसेच या बदलाचा परिणाम पिकांवर ही होतो.योग्य वेळी काळजी घेतली की, हा संभाव्य धोका टाळता येतो. पेरूवर किड पडू नये, पिवळा पडू नये यासाठी विस दिवसातून एकदा फवारणी करावी लागते. यामध्ये वॉटर स्लोबल फर्टिलायझर, बारा एकष्ट झिरो, झिरो बावन्न चौत्तीस, झिरो झिरो पनास, कॅल्शियम बोराम या खतांचा समावेश होतो.तसेच शेणखत ही सर्वत्र टाकले जाते.

**लागवड खर्च :** पेरूच्या लागवडी पासून ते प्रत्यक्ष उत्पादन येई पर्यंत जवळपास आठ ते साडे आठ लाख रुपये खर्च आला.यामध्ये खतांचा खर्च, निंदणी,फवारनी, पेरु तोडणी या कामासाठी मंजूरावरील खर्च, पेरूच्या वाढीसाठी पोम व कॅरीबॅग यांचा वापर होतो.ट्रान्सपोर्टवरील यांचा यामध्ये समावेश होतो.

**पिक किती दिवसात येते :** पेरूच्या झाडाच्या लागवडीपासून जवळपास अठरा महिन्यात फळ तोडणी लायक बनतात.वर्षातून दोन वेळेस पिक घेता येते.तसेच एकदा पिक घेतल्यानंतर नव पिक चांगले येण्यासाठी हार्वेस्टिंग करावी लागते.या झाडांचे वय साधारणतः पंधरा वर्षाचे असते.

**बाजारपेठ :** धर्माबाद तालुक्यातून निझामाबाद, नांदेड व हैद्राबाद येथील मोठ्या बाजारापेठा आहेत.माल कॅरेट पद्धतीने विक्री होतो.रेल्वे अथवा खाजगी वाहनाने सहज पद्धतीने माल विक्रीच्या ठिकाणी पोहचवता येते.

**उत्पन्न** : पुंडिलक पुजरवाड यांना आपल्या सहा एकर क्षेत्रात पेरूच्या उत्पादनातून जवळपास वीस ते एकवीस लाखांचे उत्पन्न मिळाले.पारंपरिक शेतीपेक्षा फळबागांची शेतीतील प्रयोगामुळे त्यांच्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली.

**अंतरपीक :** पेरूच्या दोन झाडात जास्त अंतर असल्यामुळे सहजपणे अंतरपीक घेता येते.मागील तीन वर्षात त्यांनी सोयाबीन तसेच झेंडुच्या फुलांची हजार झाडे लावली.यातून ही त्यांना सात लाख रुपये उत्पन्न मिळाले.तसेच झेंडुच्या झाडांमुळे पेरूच्या झाडावर रोगराई होण्यापासून ही संरक्षण करते.



शेती ही पारंपरिक पद्धतीने करण्याचे दिवस आता इतिहस जमा होत असून जो आधुनिक पद्धतीने शेती करेल तोच या भांडवली जगात टिकेल .त्यामुळे शेतकऱ्यांनी नवे प्रयोग आपल्या शेती – मातीला पोषक प्रयोग करावेत असे आव्हान ही त्यांनी केले . **पुंडलिक पुजरवाड, प्रयोगशील शेतकरी, रत्नाळी**



# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप रद्द केल्याने संताप, आंदोलन छेडण्याचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची स्कॉलर्शिप अचानक रद्द करण्यात आल्याने अल्पसंख्याक समाज तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने हि स्कॉलर्शिप विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर रद्द केल्याने आणखी राग पालक वर्गात व्यक्त केला जात आहे. सामाजिक व शैक्षणिक संस्थांमध्ये नाराजी आहे. जाणूनबुजून अल्पसंख्याक समाजाला टार्गेट करण्यासाठी असला निर्णय घेण्यात आला अशी भावना पालकवर्गात आहे. यामुळे राज्यातील लाखो तर देशातील कोट्यावधी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला व रहीवाशी व लागणारी कागदपत्रे जोडून नियमानुसार ऑनलाईन अर्ज भरला आहे. हि स्कॉलर्शिप पुन्हा बहाल करण्यात यावी या मागणीचे निवेदन विभागीय आयुक्त यांचेमार्फत केंद्रीय अल्पसंख्याक मंत्र्यांना पाठवले आहे. भारत सरकारच्या अल्पसंख्याक विभागामार्फत दरवर्षी गरीब अल्पसंख्याक विद्यार्थी( शिख, जैन, बौद्ध, मुस्लिम, पारशी, ख्रिश्चन) यांना दिली जाते. या निर्णयाला त्वरित स्थगिती देण्यात यावी नसता काही दिवसांत पालक रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. निवेदन सादर करताना समाजसेवक साहेबखान पठाण, क्राईम इन्फॉर्मेशन डिव्हिजनचे शेख रशीद रहेमान, राहुल भोटकर, एमडी तय्यब जफर, इरफान खान, सय्यद अहेमद, पंडीत वेलदोडे आदी उपस्थित होते. न्याय मिळाला नाही तर न्यायालयात दाद मागणार असे निवेदनात म्हटले आहे.

# ग्रामसभेतच सरपंचपतीची ग्रामस्थाला शिवीगाळ करत धक्काबुक्की

## फर्दापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** तालुक्यातील जामठी येथे मंगळवार रोजी तक्रारदार सोयगांव तालुक्यातील फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीत जामठी या ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते त्या ग्रामसभेत गावातील एक बौद्ध समाजातील नागरिक उमेश हरी सरोदे वय 44 वर्ष हे ग्रामसभेत गेले होते त्यावेळी त्यांनी ग्रामसेवक संदीप सावंत व उपसरपंच हरीदास जाधव यांना सामान्य नागरिक म्हणून विचारले की, मागच्या वेळेस जो दलित वस्तीत पाण्याचा होता त्याचा जो निधी आला होता त्याचे तुम्ही काय केले? असे विचारत असताना त्यांनी मला सांगितले की, तो दलित वस्तीचा पाण्याचा हौद बांधून झाला आहे. असे उत्तर दिले.

तेव्हा त्या उत्तराने तक्रारदार यांचे समाधान न झाल्याने त्यांनी पुन्हा उपसरपंच व ग्रामसेवक यांना विचारले की, हौद कुठे बांधला? बांधला असेल तर तुम्ही दलित वस्तीतील लोकांना विश्वासात घेऊन तो पाण्याचा हौद बांधला का? असे तक्रारदार विचारत असताना व सविस्तर त्यांच्याशी सविस्तर चर्चा करत असताना सरपंच पती विलास दरबार राठोड हा तेथे आला व तक्रारदार याला म्हणाला की "मादरचोद तू मला सांगतो का? पाण्याचा हौद कुठे बांधावा,अशी दमदाटी करुन मला शिवीगाळ केली व लोटलाट करून धक्काबुक्की केली व चापट बुक्क्यांनी मारहाण केली. असेही तक्रारदार याचे म्हणणे आहे त्या ग्रामसभेत उपस्थित असलेल्या ग्रामपंचायत सदस्या शारदाबाई विनोद इंगळे यांनी भांडण सोडवा सोडवा म्हणत होत्या तर त्यांना सुद्धा आडदांड सरपंच पती विलास राठोड व त्याची आई लाछाबाई दरबार राठोड यांनी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व लोटलात केली. यामुळे ग्रामसभेत मोठा गोंधळ उडाला या सरपंच पती व त्याची यांच्या विरोधात फर्दापुर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल झाली असून सरपंच पती विलास राठोड व त्याची आई यांच्या विरोधात तक्रारदार उमेश हरी सरोदे यांच्या तक्रारीनुसार भादवी कलम 324,504,34 अन्वये नोंद केला असून पुढील तपास कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक डी बी वाघमोडे हे करित आहे.

# महात्मा फुले विद्यालयात एड्स जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** अजिंठा येथे लिंक वर्कर प्रकल्प व जागतिक एड्स दिनानिमित्त मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद व ग्रामीण रुग्णालय अजिंठा यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात एड्स जनजागृती, पोस्टर प्रदर्शन,चाचणी परीक्षा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक भोंबे एस.व्ही., ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक नितीन गजबे व अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण चव्हाण, लिंक वर्कर प्रकल्प संचालक अप्पासाहेब उगले, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती अन्नपूर्णा ढोरे, सुपरवायझर उमेश श्रीवास्तव यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमात नितीन गजबे, अरुण चव्हाण व मुख्याध्यापक भोंबे यांनी विद्यार्थ्यांना एड्स या आजाराची कारणे, लक्षणे, घ्यावयाची काळजी व उपाय याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एड्स हा आजार झालेल्या व्यक्तींना समाजामध्ये सापत्न वागणूक न देता त्यांना सन्मानाने



जगण्यासाठी व औषधोपचारासाठी मदत करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन अरुण चव्हाण देशमुख लिंक वर्कर यांनी केले. नितीन गजबे यांनी पोस्टर प्रदर्शन द्वारे एचआयव्ही, एड्स आजाराची कारणे व घ्यावयाची काळजी याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठीअजिंठा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिनाजी खंदारे वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज डोंगळकर, डॉ. किरण शेळके, इकबाल कासम तडवी बागुल जिल्हाध्यक्ष आदिवासी विभाग औरंगाबाद वैद्यकीय परिचारिका श्रीमती माया ढगे, नितीन खडके,इम्रान शेख, प्रयोगशाळा तंत्रज्ञ मोनाली सोनवणे, पियुष तशीवाल, रामनाथ बडसल सुरेश गव्हाणे यांसह विद्यालयाचे प्रा.के.एस. घोंगडे, प्रा.ए.के. बुलबुले, प्रा.डॉ.गोपीनाथ डापके, प्रा.कळम पी. आर., प्रा.किरण मोरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद यांच्या वतीने प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा.एकनाथ जंजाळ यांनी केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in